


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २०२ * नांदेड * शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# घनघन माला नभी दाटल्या, कोसळल्या धारा!

## संततधार पावसाने खरीप सुखावला, सर्वाधिक पाऊस किनवट आणि बिलोली तालुक्यात, नद्यांना आले पूर

**नांदेड (शिवाजीराजे पाटील/ प्रल्हाद कांबळे)**– बुधवार, दि. २९ जुलैच्या मध्यरात्रीपासून नांदेड शहरासह जिल्हाभरात वरुणराजाने दमदार हजेरी लावली. अनेक दिवसांपासून पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला असून, गुरुवारी दिवसभर अधूनमधून सुरू असलेल्या पावसाच्या सरींमुळे संपूर्ण परिसरात प्रसन्न वातावरण निर्माण झाले. जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांतही समाधानकारक पाऊस झाल्याने खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र आहे.

यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप पिकांवर संकटाचे ढग दाटून आले होते. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद तसेच इतर पिके पाण्याअभावी करपू लागली होती. शेतकऱ्यांमध्ये दुबार पेरणीची चिंता निर्माण झाली होती. मात्र, मध्यरात्रीपासून सुरू झालेल्या पावसामुळे शेतशिवारात पुन्हा एकदा आशेचा अंकुर फुटला आहे. कोमेजलेल्या पिकांना जीवदान मिळाले असून, जमिनीत ओलावा निर्माण झाल्याने पिकांच्या वाढीस पोषक वातावरण तयार झाले आहे.


जिल्ह्यात गुरुवारी दि. ३० जुलै सकाळी साडेआठ वाजेपर्यंतच्या २४ तासांत संततधार पावसाने खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला. जिल्ह्यात सरासरी ३५.५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर मुदखेड तालुक्यातील मुदखेड (८०.५० मिमी) व मुगट (९२.५० मिमी) तसेच किनवट तालुक्यातील उमरी बाजार (६६.०० मिमी) या तीन महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. किनवट तालुक्यात एक ग्रामपंचायत कर्मचारी वाहून गेला असून त्याचा शोध प्रशासनाच्या वतीने घेण्यात येत आहे. बिलोली तालुक्यातही नदी- नाल्यांना पूर आल्याने अनेक गावांच्या संपर्क तुटला आहे.

मुसळधार पावसामुळे नांदेड शहरातील वजिराबाद, शिवाजीनगर, भाग्यनगर, इतवारा, गुरुद्वारा चौक, हिंगोली गेट, देगलूर नाका आदी प्रमुख भागांतील रस्त्यांवर पाणी साचले होते. अनेक ठिकाणी नाल्या व ड्रेनेज तुडुंब भरून ओसंडून वाहत असल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागली. काही भागांत वाहतुकीचा वेग मंदावला, तर दुचाकीस्वारांना विशेष अडचणींचा सामना करावा लागला.

या पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी खरीप पिकांना चांगला फायदा होणार असून, मागील काही दिवसांपासून **(पान ३ वरून...)**

### तीन मंडळांत अतिवृष्टी; जिल्ह्यात सरासरी ३५.५० मिलिमीटर पावसाची नोंद

जिल्ह्यात सर्वाधिक ७५.७० मिलिमीटर पाऊस मुदखेड तालुक्यात झाला. त्यापाठोपाठ किनवटमध्ये ५०.२०, अर्धापूरमध्ये ४७.३०, हिमायतनगरमध्ये ४७.६०, माहूरमध्ये ४५.३०, उमरीमध्ये ४३.८०, नांदेडमध्ये ४०.८० आणि भोकरमध्ये ३८.५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. देगलूरमध्ये ३२.६०, हदगावमध्ये ३२.४०, धर्माबादमध्ये ३२.३०, नायगावमध्ये २९.३०, मुखेडमध्ये २३.१०, बिलोलीमध्ये २२.१०, लोहामध्ये २१.२० तर कंधारमध्ये १८.६० मिलिमीटर पाऊस झाला.



जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पैनगंगा नदीला पूर आला आहे. यामुळे इस्लापूरजवळ असलेल्या सहस्त्रकुंड येथील निसर्गरम्य धबधबा ओसंडून वाहत आहे.










## शहरातील एनएसबी कॉलेजच्या ऐन गेटसमोर रस्ता अचानक खचला, कार थेट खड्ड्यात कोसळली

### प्राध्यापक बालंबाल बचावले

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील वजिराबाद भागात असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेजमधील मराठी विभागाचे प्रा. चंद्रशेखर एंगडे हे आपल्या कारमधून सायंकाळच्या सुमारास घराकडे निघाले, परंतु अचानक कॉलेजच्या प्रवेशद्वारासमोर रस्ता खचत असल्याचे त्यांच्या लक्षात येताच ते तातडीने गाडीतून बाहेर पडले. याचवेळी मोठा खड्डा पडून गाडी अर्ध्याहून अधिक खड्ड्यात उतरली. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही. दोन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असल्याने हा नदीकाठचा किनारा दबला असल्याचे बोलले जात आहे.


एनएसबी महाविद्यालयातील प्रा. चंद्रशेखर एंगडे हे कामकाज संपवून गुरूवारी सायंकाळी आपली कार घेऊन बाहेर पडत होते. त्यावेळी प्रवेशद्वारासमोरील रस्ता अचानक खचून मोठा खड्डा पडला आणि काही कळायच्या आत कार समोरच्या भागाकडून या खड्ड्यात पडली. वेळीच कारबाहेर पडल्याने प्राध्यापक थोडक्यात बचावले. अचानक रस्ता खचल्याने या मार्गावरील विद्यार्थी व अन्य प्राध्यापक अडकून पडले होते. क्रेनच्या सहाय्याने खड्ड्यात उतरलेली कार बाहेर काढण्यात आली. सुदैवाने या अपघातात कुठेही अनुचित घटना घडली नाही.



## पुराच्या पाण्यात युवक वाहून गेला; किनवटच्या उमरी बाजार मंडळात अतिवृष्टी; पैनगंगेला दुथडी

**किनवट (प्रतिनिधी)**– शहरासह तालुक्यात गेल्या २४ तासांत पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. तालुक्यातील सीमावर्ती कंचली गावातल ३० वर्षीय युवक पुराच्या पाण्यात वाहून गेला. उमरी बाजार मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या मंडळात २४ तासांत तब्बल ६६ मि.मी. पाऊस झाला. जोरदार पावसामुळे किनवटची पैनगंगा नदी दुथडी भरून वाहत आहे.

तालुक्यात गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, नदीनाल्यांना पूर आला आहे.तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या कंचली गावातील राजू रेड्डी दांडेलू नामक युवक बुधवारी सायंकाळी पुलावरून वाहत असलेल्या पाण्यातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात प्रवाहात वाहून गेला. जोरदार पावसामुळे इस्लापूर परिसरातील पांगरपहाड, आंदबोरी, रेवानाई तांडा, अप्पारावपेठ आदी गावांचा संपर्क तुटला. कमी उंचीच्या पुलांमुळे दरवर्षीच अशी स्थिती निर्माण होते. बुधवारी दिवसभर परिसरात रिमझिम पाऊस सुरू होता. मात्र, रात्रीपासून गुरुवारी सायंकाळपर्यंत काही भागांत मध्यम तर अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील लहान-मोठे नाले आणि नद्या ओसंडून वाहू लागल्या आहेत. किनवटची मुख्य वाहिनी असलेली पैनगंगा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे.



**प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा**

पावसाचा वाढता जोर आणि पूरपरिस्थिती पाहता स्थानिक प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेष खबरदारी बाळगावी. छोटे पूल किंवा पाण्याच्या वेगात असलेले नाले ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. धोकादायक ठिकाणी प्रवास टाळावा आणि अत्यंत महत्त्वाचे काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये. विशेषतः नदीकाठच्या आणि सखल भागात राहणाऱ्या रहिवाशांनी सतर्क रहावे आणि प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## महाराष्ट्रभरात पावसाचं धुमशान! मुंबई-पुण्यासह विदर्भ, मराठवाड्यातील ३१ जिल्ह्यांना झोडपणार

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्रभरात पावसाचं धुमशान बघायला मिळत असून बहुतांश जिल्ह्याला पावसानं अक्षरशः झोडपून काढलं आहे. परिणामी अनेक नदी-नाले आणि धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या एका कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत पावसाचा जोर वाढल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. अशातच पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे.


या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेशमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे.


हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील ३१ जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. ज्यामध्ये कोकणातील सिंधुदुर्ग, पुणे घाटमाथा, जळगाव, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर घाटमाथा, परभणी, हिंगोली आणि जालना येथे विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे. तर मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, सातारा, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, लातूर, बुलडाणा, अमरावती, अकोला, भंडारा, वर्धा, नागपूर, वाशिम आणि यवतमाळमध्ये भारतीय हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केलाय. तर विदर्भातील गोदिंया, गडचिरोली आणि चंद्रपूर येथे भारतीय हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला. मोठ्या विश्रांतीनंतर राज्यात पुन्हा एकदा सर्वदूर पाऊस होताना दिसत आहे. पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. राज्यात पुढील ५ दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरण पूर्ण क्षमतेने भरलंय. परिणामी कोणत्याही क्षणी राधानगरी धरणाचे स्वयंचलित दरवाजे उघडण्याची शक्यता आहे. दरवाजे उघडताच भोगावती आणि पंचगंगा नदीची पाणी पातळी वाढणार असल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना प्रशासनाकडून **(पान ६ वर...)**

## शिवसेना पक्ष अन् चिन्हाबाबत पुढील सुनावणी ४ ऑगस्टला

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– शिवसेना पक्ष, निवडणूक चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेच्या अत्यंत संवेदनशील मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात गुरूवारी प्रत्यक्ष सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या तीन न्यायमूर्तींच्या पीठासमोर ही सुनावणी झाली. न्यायालयाने दोन्ही बाजूंना आवश्यक कागदपत्रांचे संकलन सादर करण्याचे निर्देश दिले असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी येत्या ४ ऑगस्ट रोजी निश्चित करण्यात आली आहे. सुनावणी दरम्यान ठाकरे गटाची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. त्यांनी सुरुवातीला आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर भर दिला.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षणासाठी न्याय्य निधी वाटप कधी?

देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया शिक्षणावर उभा असतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे, समग्र शिक्षा अभियान आणि पंतप्रधान पोषण योजना यांसारख्या उपक्रमांचा उद्देश प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचविणे हा आहे. मात्र, या योजनांसाठी होणाऱ्या निधी वाटपात जर राज्यांमध्ये असमतोल राहिला तर शिक्षणातील समान संधीचे तत्त्वच धोक्यात येते. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केंद्र सरकार-समोर मांडलेली भूमिका ही केवळ एका राज्याची आर्थिक मागणी नसून, शिक्षण क्षेत्रातील न्याय्य वाटपाची गरज अधोरेखित करणारी आहे. महाराष्ट्रात देशातील सुमारे ८.६१ टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एवढी मोठी विद्यार्थीसंख्या असताना समग्र शिक्षा अभियानासाठी केंद्र सरकारकडून मिळणारा निधी केवळ ३.०६ टक्के एवढी तुटपुंजी असल्याची बाब गंभीर आहे. विद्यार्थीसंख्या, भौगोलिक विस्तार, आदिवासी व दुर्गम भागातील शैक्षणिक गरजा आणि सामाजिक विषमता यांचा विचार करता हा निधी अपुरा असल्याची भावना स्वाभाविक आहे. महाराष्ट्राची परिस्थिती इतर अनेक राज्यांपेक्षा वेगळी आहे. एका बाजूला मुंबई, पुणे, नागपूरसारखी महानगरे आहेत, तर दुसऱ्या बाजूला गडचिरोली, नंदुरबार, पालघरसारखे दुर्गम आणि आदिवासी भाग आहेत. या भागांमध्ये शाळा चालविणे, शिक्षक उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविणे आणि शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे निधी वाटपासाठी केवळ लोकसंख्या किंवा ठरावीक सूत्र न वापरता भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीलाही महत्त्व दिले गेले पाहिजे. पंतप्रधान पोषण योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या आचारी आणि मदतनीसांच्या मानधनाचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. दरमहा केवळ रुपये ६०० इतका केंद्राचा वाटा आणि उर्वरित रुपये १,९०० राज्य सरकारकडून देण्याची व्यवस्था आजच्या महागाईच्या काळात वास्तववादी वाटत नाही. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार देणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे केंद्राचा वाटा रुपये २,००० पर्यंत वाढविण्याची मागणी रास्तच म्हणावी लागेल. राज्यातील अनुदानित शाळांची स्थितीही चिंताजनक आहे. केवळ २५ टक्के शाळा अनुदानित असल्या, तरी त्यामध्ये जवळपास ५० टक्के विद्यार्थी शिक्षण घेतात. शिक्षकांचे वेतन आणि निवृत्तीवेतनाचा मोठा भार राज्य सरकार उचलते. मात्र, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, शाळा इमारती, डिजिटल सुविधा यांसारख्या पायाभूत गरजांसाठी केंद्राकडून पुरेसा निधी मिळत नाही. परिणामी अनेक शाळा आर्थिक अडचणीत सापडतात आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. याहूनही अधिक चिंताजनक बाब म्हणजे राज्यात १,२०० हून अधिक मराठी शाळा बंद झाल्या असून, सुमारे १७,५०० शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचे चित्र आहे. ही केवळ आकडेवारी नसून मातृभाषेतील शिक्षणासाठीचा इशारा आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलांना जवळच्या शाळा बंद झाल्यास शिक्षणापासून दूर जावे लागते. विशेषतः मुलींच्या शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होतो. शाळेचे वाढते अंतर, शौचालयांचा अभाव, वाहतुकीच्या समस्या आणि काही भागांतील बालविवाह यांसारख्या कारणांमुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहते. हे सामाजिक प्रगतीसाठी घातक आहे. केंद्र आणि राज्य सरकारे ही परस्परविरोधी नसून विकासाची भागीदार आहेत. त्यामुळे निधी वाटपात राजकीय विचारांपेक्षा विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च मानले पाहिजे. समग्र शिक्षा अभियानासाठीचे सूत्र अधिक पारदर्शक, वस्तुनिष्ठ आणि गरजांवर आधारित असावे. विद्यार्थीसंख्या, भौगोलिक अडचणी, सामाजिक मागासलेपणा, आदिवासी भाग, शाळांची पायाभूत स्थिती आणि शिक्षणातील गुणवत्तेची उद्दिष्टे या सर्व बाबींचा समावेश करून निधीचे पुनर्वाटप करण्याची वेळ आली आहे. शिक्षणावरील खर्च हा खर्च नसून भविष्यातील गुंतवणूक आहे. सक्षम, सुशिक्षित आणि कौशल्यसंपन्न पिढी घडवायची असेल, तर केंद्र आणि राज्य या दोघांनीही शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. महाराष्ट्राने मांडलेल्या मागण्यांकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून नव्हे, तर राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने पाहिले गेले पाहिजे. शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी न्याय्य निधी वाटप, पायाभूत सुविधांचा विकास आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविणे हीच आजची खरी राष्ट्रीय गरज आहे.

# पर्यापुरणपुरक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात आवश्यक!



आजची शिक्षणपद्धती ही पर्यावरणपुरक नाही असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. त्याचं कारणंही तसंच आहे. शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. ते बरोबर आहे. कारण ते पिल्यावर लोकं वाघिणीसारखं गुरगुरणार असं लोकांना वाटतं. पण त्यात तसूभरही सत्यता नाही. कारण अलीकडं लोकांनी शिक्षणाला वाघिणीचं नाही तर शेळीमेंढीचं दूध बनवलं आहे. जे प्राशन करताच मनुष्य शेळीमेंढीसारखा वागायला लागतो. मग कोणीही येवून त्याला गुलाम बनवून त्या लोकांना शेळीमेंढीसारखाच वापर करीत असतो.

माणसांच्या या शिक्षणपद्धतीत ज्याप्रमाणे अशा वाघाच्या गुरगुरण्याला महत्व आहे. तसेच महत्व पर्यावरणपुरक शिक्षणालाही आहे. आता लोकं म्हणतील की आम्ही पर्यावरणपुरक शिक्षण घेत नाहीत का? आमच्याही शिक्षणात पशूपक्षांना महत्व आहे. त्यांचा अभ्यास आम्ही करतो. आम्ही पृथ्वीचा अभ्यास करतो. आम्ही गाय दूध देते, हे अभ्यासतो. झाडं फळं देतात हेही अभ्यासतो. हा पर्यावरणाचा अभ्यास नाही का? होय, हाही पर्यावरणाचाच अभ्यास आहे. पण महत्वाची गोष्ट अशी की, या अभ्यासातून पर्यावरण वाचवा हा संदेश मिळत नाही. खरं तर आम्ही असे बोललो की आम्हाला लोकं वेड्यात काढल्याशिवाय राहणार नाही.

आम्ही भूगोल शिकतो. सामान्य विज्ञान शिकतो. भौतीकशास्त्र शिकतो. त्यातच पर्यावरणही शिकतो. कशानं शिकतो तर त्याचं उत्तर येईल की पाठ्यपुस्तकानं. आता पाठ्यपुस्तक कशी बनतात? असा प्रश्न विचारल्यास काही चूप राहतील. काही हसतील व काहींकडून उत्तर येईल की, कागदावर छपाई करुन त्याला बाईंडींग करुन पाठ्यपुस्तक बनतात. मग विचारलं की कागद कसा बनतो? तर उत्तर येईल लाकडापासून. आता लाकूड कोणते? आता मात्र उत्तर बहुतेक येणारच नाही.

कागद तयार करतांना शेकडो झाडांची हत्या केली जाते. त्या लाकडाचा किस काढला जातो. तो किस भिजत टाकला जातो व त्यापासून लगदा तयार करुन कागद तयार केला जातो. जे पर्यावरणपुरक नाही. आता लोक म्हणतील की झाडांचा उपयोग नाही केला तर पाठ्यपुस्तक तयार कशी होतील? अन् झाडांना जीव नाही. परंतू महान शास्रज्ञ जगदिशचंद्र बोस यांनी लाजाळूच्या पानावर १० मे १९०१ मध्ये एक प्रयोग करुन सिद्ध केलं की वनस्पतींलाही जीव आहे. त्या वनस्पतीच्या लाकडापासून किस काढतांना वा वनस्पतीचं लाकूड कापतांना वृक्षांची हत्या होतच असते.

विशेष म्हणजे आम्ही आमचं जीवन जगण्यासाठी जे घटक अभ्यासातून शिकतो. त्यात मांस खाणे, अंडी खाणे, मासे खाणे ह्याही गोष्टींचा अभ्यासक्रमात समावेश होतो. समजा एखादी विहिर खोदण्याची कलाही आम्हाला अभ्यासातूनच शिकता येते. ज्या विहिर खोदण्यातून पृथ्वीला इजा होवून पृथ्वीची भुगर्भ साखळी बिघडते. त्यातच जागोजागी पृथ्वीला तडे जावून कुठं कुठं भुकंप होतात. तर कुठंकुठं भुस्खलन. पृथ्वीचा हाच अभ्यास करीत असतांना लोकं दगडी कोळसा मिळविण्यासाठी वा खनिजे मिळविण्यासाठी पृथ्वीचं गर्भाक्षय खोदतात. त्याचा परिणाम असा होतो की ज्या भागात अशी खनिजे मिळतात. त्याखाली बरीचशी पोकळी पडल्याने ती पोकळी ज्यावेळी खचते. त्यावेळी तिथे पर्वतरांग तयार होते हे तेवढेच खरे आहे. परंतू ही पर्वतरांग तयार होतांना कित्येक त्या भागात राहणारी माणसं ही त्या पर्वतरांगेत गाडली जातात. म्हणून आजची शिक्षण पद्धती ही पर्यावरणपूरक नाही.

पूर, भूकंप, वादळं यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. मांस खाणे वा मासे खाणे गरजेचे आहे. कारण त्यापासून आपल्या शरीराला जीवनसत्व व संप्रेरके मिळतात. तसं पाठ्यपुस्तकातच लिहिलेलं आहे. परंतू त्यातून निसर्गाची हानीही होते हे मात्र पुस्तकात लिहिलेलं नाही. लाकूडतोड करुन घर बांधतात हे पुस्तकात लिहिलेलं आहे. परंतू त्यातून निसर्गाची हानी होते हे काही पुस्तकात लिहिलेलं नाही. त्यातच पाणी मिळविण्यासाठी विहिर खोदणे हे पुस्तकात लिहिलेलं आहे. परंतू त्यातून निसर्गाची हानी होते हे मात्र पुस्तकात लिहिलेलं नाही. कोणताही सजीव हा निसर्गाचा लेकरु. मग तो लहानात लहान असलेला जीवाणू का असेना वा विषाणू का असेना.

ज्यावेळी निसर्ग कोपतो.त्याचा समतोल बिघडतो. त्यावेळी निसर्गही निसर्गसाखळी बदलवतो आणि तोच निसर्ग जणू बदला घेतल्यागत वेगवेगळ्या आजारामार्फत पृथ्वीवर बदला घेण्यासाठी येतो. तोच बदला म्हणजे कोरोना व्हायरस किंवा ब्लैक फँगस म्हणता येईल. तो बदला घेण्यासाठी जेव्हा येतो. त्यात भल्लीमोठी हानीही होते.

आमच्या शिक्षणात हा जो बदल होत असतो. तोच बदल म्हणजे कोरोना व्हायरस किंवा ब्लैक फँगस होय. आमची अन्नसाखळी ही पाठ्यपुस्तकातून हेच सत्य प्रतिपादन करीत असते. आमची शिक्षणपद्धती ही चोरावर मोर असंच शिकवीत असते. जसे बेडकाला साप खातो. सापाला गिधाडं खातात. गिधाडं मेली की त्यांना जमीनीतील किटकं खातात. अशा किटकांना पुन्हा बेडकं खात असतात. पुन्हा बेडकाला साप. सापाला गिधाडं. ही आमची शिक्षणपद्धती...पण ही आमची शिक्षणपद्धती पर्यावरण पूरक नाही.

महत्वाची गोष्ट अशी की आमची शिक्षणपद्धती ही पर्यावरण पुरक असो की नसो. पण अभ्यासक्रमातून पर्यावरण वाचवा असा संदेश देता यावा. कागद जर बनवायचा असेल तर वृक्षांची कत्तल होवू नये. कागद हा वाळलेल्या झाडापासून बनविण्यात यावा.

मांस खाणे वा मासे खाणे हे जरी शरीरासाठी आवश्यक असलं तरी मांस खाणं हे वाईटच तसेच पाण्यासाठी साधी विहिर खोदणे ही जरी चांगली गोष्ट असली तरी यामुळं पर्यावरण साखळी बिघडते. असा संदेश पर्यावरण शिक्षणातून देण्यात यावा. तसेच लाकडाच्या चिपाडापासून कागद बनून त्या कागदाचे पाठ्यपुस्तक बनते हेही खरं असलं तरी कागद बनविणे ही गोष्ट वाईटच. ही गोष्ट पर्यावरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने हानीकारक आहे. तेव्हाच आमची शिक्षणपद्धती पर्यावरण पुरक होईल असे म्हणता येईल. हे तेवढंच खरं आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# विषारी भेसळीच्या विळख्यात सामान्यांचे आरोग्य धोक्यात?

माणूस आजारी पडल्यावर शेवटचा पर्याय म्हणून औषध घेतो, पण तिथेही जर विष कालवलेले असेल, तर सामान्यांनी जगायचे कसे?हा प्रश्न आज प्रत्येक जागरूक नागरिकाच्या मनात निर्माण झाला आहे. सध्या बाजारपेठेत अन्न व औषध प्रशासनाच्या एका धडक आणि प्रामाणिक कारवाईमुळे अभूतपूर्व चित्र पाहायला मिळत आहे. बाजारातील उघड्यावरील दुग्धजन्य पदार्थ, खुली चहा-कॉफी, सुटे मसाले आणि रोजच्या खाण्यापिण्याच्या अनधिकृत गोष्टींची विक्री थेट बंद झाली आहे. आरोग्याला घातक असणाऱ्या गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूवरही कडकडीत बंदी आली आहे. या धडक कारवाईमुळे बाजारात तात्पुरता तुटवडा निर्माण झाला असला, तरी या निमित्ताने एक अत्यंत कळीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जर एक कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी यंत्रणा हलवून एवढा मोठा सकारात्मक बदल घडवून आणू शकतो, तर मग इतर विविध विभागांतील जबाबदार अधिकारी वर्षानुवर्षे काय करत आहेत? हा प्रश्न केवळ व्यवस्थेला नाही, तर आपल्या संपूर्ण सामाजिक चौकटीला विचारणारा आहे.

**आलिशान चकचकाट...**
**पण किचनमध्ये नरकयातना!**

या संपूर्ण कारवाईच्या निमित्ताने हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सचे एक अत्यंत भयंकर वास्तव समोर आले आहे. बाहेरून अत्यंत देखणी, वातानुकूलित, चकचकीत आणिआलिशान वाटणारी ही प्रतिष्ठाने ग्राहकांकडून हजारो रुपये उकळतात. पण कधी विचार केला आहे का, की ज्या अन्नासाठी आपण खिसा खाली करतोय, ते बनते कुठे? मुळात जर ग्राहकांनी या आलिशान हॉटेल्सची किचन (स्वयंपाकघर) आणि स्टोअर रूम (कोठार) प्रत्यक्ष जाऊन तपासली, तर सामान्य माणूस बाहेरचे खाणे कायमचे सोडून देईल!

स्वच्छतेचा पत्ताच नाही: चकचकीत डायनिंग एरियाच्या पडद्यामागे अत्यंत अस्वच्छ, दुर्गंधीयुक्त आणि दमट वातावरणात अन्न शिजवले जाते.

**कीटक आणि उंदरांचा सुळसुळाट:** अनेक मोठ्या हॉटेल्सच्या स्टोअर रूम्समध्ये उंदीर, झुरळे आणि कीटकांचा सुळसुळाट असतो. तिथेच उघड्यावर अन्नधान्य आणि भाज्या साठवून ठेवल्या जातात.

**आरोग्य हे केवळ कमाईचे साधन:** या अस्वच्छतेत भर पडते ती म्हणजे मागून आणलेल्या



भेसळयुक्त कच्च्या मालाची. स्वस्त मिळतो म्हणून निकृष्ट दर्जाचे तेल, कृत्रिम रंग, मुदत संपलेले मसाले आणि चायनीज सॉसेसचा बेधडक वापर केला जातो.

**पाण्याचा जीवघेणा खेळ:** आरओ आणि पॅकेज्ड वॉटरमधील भेसळ अन्नाच्या अस्वच्छतेसोबतच आता आणखी एक भयंकर प्रकार समोर येत आहे, तो म्हणजे आपण जे पाणी शुद्ध समजून पितो, त्या पाण्याचा! आजकाल बाजारात मिळणारे जारचे पाणी, आरओ फिल्टर प्लांट्स आणि पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर केमिकल्स (रसायने) मिसळली जात आहेत. अनेक प्लांट्समध्ये पाणी योग्य पद्धतीने फिल्टर न करता, केवळ त्याची चव बदलण्यासाठी आणि ते गोड लागावे म्हणून आरोग्याला घातक असणारी रसायने थेट पाण्यात मिसळली जातात. शुद्ध पाण्याच्या नावाखाली ग्राहकांच्या पदरात थेट केमिकलचे पाणी पाडले जात आहे. यातच हॉटेल्सची भूमिकाही संशयास्पद ठरते. हॉटेल्समध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या वर्षानुवर्षे साफ केल्या जात नाहीत. जेवणाचे बिल हजारो रुपये घेणारे हॉटेल्स पिण्याच्या पाण्याच्या स्वच्छतेबाबत मात्र कमालीची दिरंगाई दाखवतात, जी थेट कॉलरा, टायफॉइड आणि गॅस्ट्रोसारख्या आजारांना आमंत्रण देणारी आहे.

**औषधांमधील घटकांची कमतरता:** औषध तयार करण्यासाठी लागणारा मुख्य रासायनिक घटक म्हणजे ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इन्ग्रेडियंट. फार्मा कंपन्या खर्च वाचवण्यासाठी औषधामध्ये या मूळ घटकाचे प्रमाण ठरवून दिलेल्या मानकांपेक्षा अत्यंत कमी वापरतात. परिणामी, गंभीर आजारातही औषध घेऊन रुग्णाची तब्येत सुधारत नाही. नफ्यासाठी बनावट औषधांचा पुरवठा: मोठ्या ब्रँडचे लेबल लावून बाजारात बनावट आणि अत्यंत निकृष्ट दर्जाच्या गोळ्यांचा पुरवठा केला जातो.

**कमिशनसाठी डॉक्टरांचे मेडिकलशी साटेलोटे:** आपण डॉक्टरांना त्यांच्या उपचारांची पूर्ण फी देतो, मग तरीही त्यांनी मेडिकल स्टोअर्समध्ये स्वतःचा हिस्सा किंवा कमिशन का ठेवावे? जास्त पैसे कमवता यावेत, कट प्रॅक्टिस करता यावी म्हणून अनेक डॉक्टर भेसळ करणाऱ्या आणि निकृष्ट दर्जाची औषधे बनवणाऱ्या कंपन्यांची औषधे लिहून देतात आणि तीच औषधे रुग्णालयाच्या अंतर्गत किंवा विशिष्ट मेडिकलमध्ये ठेवायला भाग पाडतात. ही औषधे सर्रास रुग्णांच्या माथी मारली जातात.

समाजात डॉक्टर हे जीवनदाते म्हणजेच देवाचे रूप म्हणून पाहिले जातात. परंतु, तेच जर थोड्या पैशांच्या हव्यासापोटी असा काळाबाजार करत असतील, तर त्यांच्या या उच्च पदवीचा, पांढऱ्या कोटाचा आणि मानाचा समाजासाठी काय उपयोग? त्यांची समाजाप्रती काही नैतिक जबाबदारी नाही का?

**कंपन्यांची दिशाभूल आणि**
**वयोगटाची सक्ती हवी!**

बाजारपेठेत ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या कंपन्यांचा सुळसुळाट झाला आहे. अनेक बड्या कंपन्या आपल्या उत्पादनांची अशी काही दिशाभूल करणारी जाहिरात करतात, ज्यामुळे ते उत्पादन आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे असा समज होतो. विशेषतः लहान मुलांच्या खाद्यपदार्थांबाबत हा खेळ मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आता नियमांमध्ये असा बदल करण्याची गरज आहे की, प्रत्येक कंपनीने आपल्या उत्पादनाच्या पॅकेटवर ठळक अक्षरात हे लिहिलेच पाहिजे की हे उत्पादन कोणत्या वयोगटासाठी योग्य आहे. जर एखादे उत्पादन लहान मुलांसाठी योग्य नसेल किंवा हानिकारक असेल, तर तसा स्पष्ट इशारा पॅकेटवर असलाच पाहिजे.

**व्यापार आणि विक्रीची नवी नियमावली:**

भेसळ रोखण्यासाठी केवळ कंपन्यांना किंवा सरकारला दोष देऊन चालणार नाही. ज्याप्रमाणे कंपनी जबाबदार आहे, तसाच तो माल विकणारा व्यापारी आणि तो स्वीकारणारा ग्राहकसुद्धा तेवढाच जबाबदार आहे.


**अधिकाऱ्यांची कर्तव्यनिष्ठा:**
**देशाचे भवितव्य तुमच्या हातात!**

ज्याप्रमाणे एफडीए सध्या धाडसी काम करत आहे, तसेच इतर विविध खात्यांनी आणि विभागांनीही आपली कामगिरी योग्य प्रकारे आणि प्रामाणिकपणे बजावणे गरजेचे आहे. काही अधिकारी केवळ भ्रष्टाचारापोटी आणि पैशाच्या हव्यासापोटी आपल्या हातात असलेल्या अधिकारांचा गैरवापर करतात किंवा दुर्लक्ष करतात. भ्रष्टाचाराने पोखरलेली ही वृत्ती देशाचे मोठे नुकसान करत आहे. मुळात देशाचे भवितव्य हे त्या-त्या खात्यातील अधिकाऱ्यांच्या हातात असते. जर सर्वच विभागांतील अधिकाऱ्यांनी आपली भूमिका चोख आणि प्रामाणिकपणे बजावली, तर आपला भारत देश रोगमुक्त आणि विकसित होण्यास अजिबात वेळ लागणार नाही. एक प्रामाणिक अधिकारी येतो आणि व्यवस्था सुधारतो, पण त्यांची बदली झाली की पुन्हा परिस्थिती जैसे थे होते, हा आजवरचा इतिहास आहे. जर हे चित्र कायमचे बदलायचे असेल, तर प्रशासन, नेते, जबाबदार व्यापारी आणि जागरूक जनता या सर्वांना मिळून प्रामाणिकपणे काम करावे लागेल.

नेत्यांनी केवळ उद्घाटनांचे सोहळे न मिरवता, आपल्या मतदारसंघातील नागरिकांना शुद्ध अन्न, केमिकलमुक्त पाणी आणि सुरक्षित औषधे कशी मिळतील याकडे लक्ष दिले पाहिजे. चला, या निमित्ताने सुरू झालेल्या प्रशासकीय शुद्धीकरणाला समाज म्हणून आपणही साथ देऊयात. केवळ बाहेरचा चकचकाट पाहून भुलण्यापेक्षा आतली स्वच्छता तपासूयात. आरोग्याशी तडजोड नको, भ्रष्टाचाराला थारा नको आणि व्यसनाधीनतेला जागा नको, हाच संकल्प आता प्रत्येक घरात झाला पाहिजे!

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक : भोसीकर फुड्स, नांदेड.
मो. ८८०५५७५५५५

# न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया...



आज ३१ जुलै, चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले.

पंजाबी चित्रपट गुल बलोचपासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली. या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले. ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी मान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या.

पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले. मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकरांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली.

१९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला. गुरुदत्त, दिलीप-कुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले.

मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली. त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला.

भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले.

मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत. रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची नगारवाडीतील प्रगतिशील शेतकऱ्याच्या सेंद्रिय शेतीला भेट

## बांबू लागवड, एकात्मिक शेती व शाश्वत कृषी उपक्रमांचे केले कौतुक

**नांदेड (प्रतिनिधी)–** अति प्रभावित मेगा पाणलोट प्रकल्पांतर्गत लोहा तालुक्यातील नगारवाडी येथील प्रगतिशील शेतकरी विश्वनाथ जायभाये यांच्या एकात्मिक सेंद्रिय शेती प्रकल्पाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भेट देऊन विविध सेंद्रिय व नैसर्गिक शेती उपक्रमांची सविस्तर पाहणी केली. यावेळी 'एक लक्ष बांबू लागवड' उपक्रमांतर्गत शेतालगतच्या नाल्याच्या काठावर बांबूची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



या प्रसंगी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी उत्तम गायकवाड, तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे, उपकृषी अधिकारी अनिल वडजे, हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्पाचे प्रादेशिक समन्वयक दिनेश खडसे, पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक प्रवीण काटेवाड, सरपंच सुधाकर जायभाये, उपसरपंच देवराव चव्हाण तसेच कृषी, महसूल, ग्रामपंचायत आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट व अश्वमेध संस्थेचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी शेतातील विविध उपक्रमांची पाहणी करताना भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेली आंबा बाग, मनरेगाअंतर्गत उभारलेली सिंचन विहीर तसेच हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या गांडूळखत (वर्मी कम्पोस्ट) युनिटची पाहणी केली.

जायभाये यांच्या एकात्मिक शेतीमध्ये शेवगा, आंबा, जांभूळ, पेरू, चिंच, बोर, चिकू, आवळा, लिंबू, पपई, नारळ या फळपिकांसह काकडी, वांगे, टोमॅटो, मिरची आदी भाजीपाला पिकांची सेंद्रिय पद्धतीने लागवड करण्यात आली आहे. याशिवाय झेंडू फुलशेती आणि त्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञानाची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी जाणून घेतली.

यावेळी विश्वनाथ जायभाये, त्यांची पत्नी जोती जायभाये आणि मुलगा रामन जायभाये यांनी शेणखत, गांडूळखत (वर्मी कम्पोस्ट), जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत, दशपर्णी अर्क, अग्निअस्त्र आणि ब्रह्मास्त्र यांसारख्या जैविक निविष्ठांचा वापर करून पिकांचे पोषण व संरक्षण कसे केले जाते, याची सविस्तर माहिती दिली. तसेच पीक फेरपालट, आंतरपीक पद्धती, सेंद्रिय आच्छादन (मल्चिंग), जैविक कीड व रोग व्यवस्थापन आणि पाण्याचा कार्यक्षम वापर यांचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले, सेंद्रिय शेतीमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो, सूक्ष्मजीवांची संख्या वाढून मातीची सुपीकता टिकून राहते. उत्पादन खर्चात बचत होऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. तसेच रासायनिक अवशेषमुक्त अन्न उत्पादनामुळे ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षणही होते. या भेटीदरम्यान नगारवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशोशिखरावर जाण्यासाठी योग हाच सर्वोत्तम मार्ग –डॉ. गोविंद नांदेडे

## नांदेड योग समितीतर्फे डॉ. नांदेडे यांना विद्याविभूषण पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** जगात गुरु-शिष्याचे नाते फक्त भारतीय परंपरेत टिकून आहे. जीवनात यशोशिखर गाठावयाचे असेल तर योग हा सर्वोत्तम मार्ग आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले.

नांदेड नित्य योग समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी योगाचार्य नांदेड योगरत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात गुरु पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावर्षी प्रथमच समाजातील अलौकिक व्यक्तिमत्व असलेल्यांना पुरस्कार देण्याचा पायंडा समितीने पाडला आहे.

नांदेड योग सेवा समितीच्या वतीने पहिला विद्याविभूषण पुरस्कार राज्याचे माजी शिक्षण संचालक प्रा. गोविंद नांदेडे यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, प्रा. गोविंद नांदेडे यांचे गुरु योग गुरु तुळशीराम केरले गुरुजी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी चक्रधर नगरमधील टेलिफोन कॉलनीमध्ये सकाळी ५ वाजता ओमकार ध्यान, प्राणायाम व आसनांचा परिपाठ घेण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी नांदेड योग सेवा समितीचे प्रसिद्धी प्रमुख तथा वरिष्ठ पत्रकार मकरंद पांगरकर यांनी सत्कारमूर्ती डॉ. गोविंद नांदेडे यांचा कार्य परिचय करून दिला. यानंतर डॉ. नांदेडे यांचे गुरु तुळशीराम केरले गुरुजी यांच्या अनुभव लेखनाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर सबंध आयुष्यात ३९ विविध पदव्या प्राप्त करणारे तसेच शिक्षण क्षेत्रात ३६ वर्षे सेवा देणारे आणि अनेक विद्यापीठात सुवर्णपदकांसह कारकीर्द गाजवणारे डॉ. गोविंद नांदेडे यांना समितीच्या वतीने योगाचार्य नांदेड योगरत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या हस्ते विद्याविभूषण पुरस्काराने सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर योगाचार्य नांदेड योग रत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांचा गुरुपौर्णिमेनिमित्त सर्व योगशिक्षक व योग साधकांनी पुष्पहार अर्पण करून योग सेवा अर्पण केली. तर डॉ. नांदेडे यांचे पुरस्कार मिळाल्याबद्दल अभीष्टचिंतन करण्यात आले.

# निरव सोनकांबळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (यूपीएस) इयत्ता सातवीच्या परीक्षेत ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल, वाडी (नांदेड) येथील विद्यार्थी निरव सोनकांबळे यांनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातील निरव सोनकांबळे याने मिळविलेले यश अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल स्कूलचे संस्थापक, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि आई, वडील व मित्र परिवारांनी निरवचे अभिनंदन केले.

# ह.भ.प. यादव महाराज यांचा सोमेश्वर येथे कीर्तन सोहळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडजवळील सोमेश्वर (राहाटी) येथे वारकरी परंपरेतील मातोश्री बायनाबाई नामदेवराव बोकारे यांच्या पावन स्मरणार्थ कीर्तन, प्रवचन व भजनाचा भावपूर्ण सोहळा आयोजित करण्यात आला. या वेळी सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. यादव महाराज डाखोरे (वाईकर) यांनी कीर्तनातून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या जीवनकार्याचा प्रभावी उहापोह करताना, आईच्या स्मरणार्थ कीर्तन सोहळा आयोजित करणे ही भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र परंपरा असून, त्यातून आईच्या स्मृतींना उजाळा मिळतो, असे प्रतिपादन केले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी मातोश्री बायनाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर भजन व कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी नांदेड येथील गुरुद्वारा लंगर साहिबचे प्रमुख नांदेड भूषण महानसंत श्री संत बावा नरेंद्रसिंघ महाराज व संत बाबा बलविंदरसिंघ महाराज यांच्या वतीने मुख सेवादार बाबा गुरुकृपाल सिंघ यांनी उपस्थित राहून मातोश्रींना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभावी, यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात आली.

या सोहळ्यास पाहुणे, मित्रपरिवार, गावकरी व वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मातोश्री बायनाबाई या नानक-साई फाऊंडेशनचे प्रमुख तथा ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे यांच्या मातोश्री होत. त्यांना तानाजी नामदेवराव बोकारे, देविदास नामदेवराव बोकारे, प्रा. दत्तात्रय नामदेवराव बोकारे हे पुत्र तसेच महालानबाई आणि सुशीलाबाई या कन्या आहेत.

# अमृत भारत योजनेची कामे वेळेत पूर्ण करा; नांदेड डीआरएमचे अधिकाऱ्यांना निर्देश

## नांदेड- आदिलाबाद मार्गावरील ५ स्थानकांची पाहणी; प्रवासी सुविधांवर भर

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) प्रदीप कामले यांनी दि. २३ जुलै रोजी नांदेड- आदिलाबाद रेल्वे मार्गावरील स्थानकांची पाहणी करून प्रवासी सुविधा, स्थानकांचा विकास आणि रेल्वे सुरक्षेसंदर्भातील विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी आपल्या यंत्रणेला विविध विकास कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.




या पाहणीदरम्यान त्यांनी रेल्वे मार्गाची रिअर विंडो निरीक्षणाद्वारे तपासणी केली. तसेच मुदखेड, भोकर, हिमायतनगर, किनवट आणि आदिलाबाद या स्थानकांवर सुरू असलेल्या अमृत भारत स्थानक- BS योजनेअंतर्गत विकासकामांची प्रगती तपासली. याशिवाय विभागात सुरू असलेल्या विविध सुरक्षा व पायाभूत सुविधांशी संबंधित कामांचा देखील आढावा घेतला.

यावेळी डीआरएम यांनी स्थानकांवरील प्रवासी सुविधा, प्रतीक्षालये, सर्क्युलेटिंग एरिया, वाहनतळ, फलाट, स्वच्छता तसेच स्थानकांच्या एकूण देखभालीची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधून प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत सुरू असलेली सर्व विकासकामे निर्धारित वेळेत आणि उच्च गुणवत्तेसह पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

कामले यांनी विकासकामांच्या गुणवत्ता व गतीवर सातत्याने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. स्थानकांच्या आधुनिकीकरणामुळे प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित व आरामदायी सुविधा उपलब्ध होतील, यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. तसेच कामे सुरू असताना रेल्वे वाहतूक सुरक्षित ठेवण्याबरोबरच प्रवाशांना कमीत कमी गैरसोय होईल, याची विशेष काळजी घेण्यावर त्यांनी भर दिला.

ही पाहणी अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत स्थानकांचे आधुनिकीकरण, प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा, रेल्वे पायाभूत सुविधांचे बळकटीकरण आणि नांदेड विभागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आधुनिक व ग्राहकाभिमुख रेल्वे सेवा उपलब्ध करून देण्याच्या दक्षिण मध्य रेल्वेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

# 'गुरुपौर्णिमा उत्सवात निषाद'च्या गायकांनी श्रोत्यांना केले स्वरतृप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील देवकृपा फंक्शन हॉलमध्ये सुशांत पांडे यांच्या निषाद संगीत विद्यालयाच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात या विद्यालयाच्या विद्यार्थी गायकांनी आपल्या भाव-भक्तीगीतांनी रसिक श्रोत्यांना स्वरतृप्त करुन आपल्या गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष-स्थानी दिग्विजय नारंगले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रत्नाकर वाघमारे, मधुकर एकलारे यांची उपस्थिती होती. ज्येष्ठ पत्रकार अनिकेत कुलकर्णी व ॲड. शामराज राहेरकर यांची मान्यवर अतिथी म्हणून उपस्थिती होती.

शिवराणी होनशेट्ये, सीमा अरविंद यांच्या आदी बाल गायकांच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्यानंतर सोम पांडे, मुग्धा सगरोळीकर आदी बाल कलाकारांनी हीच अमुची प्रार्थना हे प्रार्थना गीत सादर केले. त्यानंतर कार्यक्रम उत्तरोत्तर बहरत गेला. प्रमोद नांदेडकर यांनी महफिलमें बार बार हरी गजल सादर करून महफिलीची रंगत आणली. मुक्ताई नाईक, पूजा नाईक, मानसी करवरे, माधुरी देशमुख, अंजली जोशी यांच्या गीतांना रसिकांनी मनसोक्त दाद दिली.

अमोल मालेगावकर यांनी आपल्या सुमधुर बासरीवादनाने रसिकांची मने जिंकली. अभिनव मालेगावकरच्या गिटारने रसिकांना मंत्रमुग्ध केले. गजानन कुलकर्णी, सागर काळे आणि अथर्व पाठक यांनी तबल्याची साथ दिली. यावेळी अनिकेत कुलकर्णी यांनीही एक भक्ती गीत गायले.

# प्रदीर्घ सेवेनंतर शिक्षक मारोती शिंदे सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** गणपतराव मोरे विद्यालय किवळा ता. लोहा येथील गणित विषयाचे शिक्षक मारोती तेजेराव शिंदे हे ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ जुलै २६ रोजी नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



हुतात्मा भगतसिंग शैक्षणिक संस्था कलंबर संचालित गणपतराव मोरे विद्यालय किवळा ता.लोहा या शाळेत मारोतराव शिंदे हे ११ जून १९९३ ला रूजु झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**पान १ वरून...**

**घनघन माला नभी दाटल्या...**

जाणवत असलेला पावसाचा खंड भरून निघण्यास मदत झाली आहे. अनेक भागांत शेततळी, ओढे-नाले आणि लहान जलस्रोतांमध्येही पाण्याची आवक वाढली आहे.

दरम्यान, १ जूनपासून आजपर्यंत जिल्ह्यात ३२५.५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, या कालावधीतील सरासरीच्या ८३.१० टक्के पाऊस झाला आहे. गतवर्षी याच दिवशी जिल्ह्यात ३४५.७० मिलिमीटर पावसाची नोंद होती. यंदा अजूनही सरासरीच्या तुलनेत काही प्रमाणात तूट असली तरी गेल्या दोन दिवसांतील संततधार पावसामुळे खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र जिल्हाभर दिसून येत आहे. गुरुवारीही जिल्ह्यात सर्वदूर पाऊस सुरू आहे.

पावसामुळे शहरातील नेहमी गजबजलेले बाजारपेठेचे रस्ते तुलनेने ओस पडले. शाळा, महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होती. अनेक पालकांनी खबरदारीचा उपाय म्हणून विद्यार्थ्यांना घरातच ठेवणे पसंत केले. दुसरीकडे, शाळकरी मुलांनी पावसात चिंब भिजत मनमुराद आनंद लुटल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. बुधवारी दुपारपासून मोठ्या प्रमाणात शहर आणि परिसरात पाऊस सुरू असल्याने शहरातील अनेक सखल भागात पाणी नागरिकांच्या घरांमध्ये शिरले आहे. काही भागात अर्धवट रस्त्यांच्या कामामुळे पावसाचे पाणी जागच्या जागी थांबून नागरिकांना संकटाचा सामना करावा लागत आहे. संततधार पावसामुळे हिंगोली गेट उड्डाण पुलाखाली आणि लालवाडी पुलाखाली पाणी साचून या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. गुरुवारी दिवसभर संततधार असल्याने नांदेड शहरातील जनजीवन विस्कळीत झाले होते. बाजारपेठात शुकशुकाट दिसून येत होता. रस्त्यावर वाहतुकीची वर्दळही कमी होती. सर्वत्र रिमझिम पावसामुळे नांदेडकरांची मात्र चांगलीच त्रेधा तिरपट उडाली.

मागील काही दिवसांपासून पावसाअभावी चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर अखेर समाधान दिसून आले. आता हा पाऊस आणखी काही दिवस अधूनमधून सुरू राहिला तर खरीप पिके चांगली उभारी घेतील. दुबार पेरणीचे संकटही टळेल, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# ग्राहक तक्रार निवारण मंचाकडून २५ वीज ग्राहक तक्रारींचा निपटारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणच्या ग्राहक तक्रार निवारण मंच नांदेडचे अध्यक्ष म्हणून निवृत अतिरिक्त कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्यक्षात ते १५ मार्च २०२६ पासून कार्यरत आहेत. माधव डोम्पले हेही स्वायत सदस्य म्हणून कार्यरत आहेत. डॉ. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आजपर्यंत २५ ग्राहक तक्रार प्रकरणाचा निपटारा करण्यात आला आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे जलद, पारदर्शक व न्याय पद्धतीने निवारण करण्यासाठी ग्राहक तक्रार निवारण मंच, नांदेड येथे कार्यरत आहे.

महावितरणच्या या मंचाच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या नवीन विद्युत जोडणी, वीज देयके, मीटर व वीज पुरवठ्या संदर्भातील तक्रारी ऑनलाईन पध्दतीने http://mcp.mahadiscom.in/cgrf या संकेतस्थळावर नोंदविता येतील. नोंदविलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संबंधित मंचामार्फत सुनावणी घेऊन तक्रार निवारण होणार आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व तक्रारदार वीज ग्राहकांनी ग्राहक तक्रार निवारण मंच (CGRF), नांदेड यांच्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध आरोग्य उपक्रमांचे यशस्वी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष मुंबई तसेच जिल्हाधिकारी नांदेड यांच्या निर्देशानुसार डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत विविध आरोग्यविषयक शिबिरे, तपासणी मोहिमा, छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबीर तसेच इतर जनकल्याणकारी आरोग्य उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने नागरिकांनी विविध आरोग्यसेवांचा लाभ घेतला.




या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विविध शिबिरांमध्ये रक्तदान शिबिरातून ३८७ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. स्तनकर्करोग तपासणी शिबिरामध्ये ३३० महिलांची तपासणी, बोन मिनरल डेन्सिटी तसेच हाडांची तपासणी, शिबिरामध्ये ३३२ नागरिकांची तपासणी, नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरामध्ये ८८८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. आवश्यक रुग्णांवर शस्त्रक्रिया तसेच पुढील उपचार करण्यात आले. तसेच गर्भाशय मुख कर्करोग तपासणी शिबिरामध्ये २२४ महिलांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन व उपचार देण्यात आले.

सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. २२ जुलै रोजी ओम गार्डन कौठा नांदेड येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ५१६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तसेच २६ जुलै रोजी ए. के. संभाजी मंगल कार्यालय वाडी (बु.) नांदेड येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ५४६ रुग्णांची तपासणी करून विविध तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या विविध आरोग्य उपक्रमांद्वारे कर्करोगासह विविध आजारांचे लवकर निदान, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, रक्तदानाबाबत जनजागृती तसेच सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण, सुलभ व सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश प्रभावीपणे साध्य झाला.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विजयकुमार कापसे, वैद्यकीय अधीक्षक रुग्णालय, डॉ. अजय वराडे उपवैद्यकीय अधीक्षक रुग्णालय, डॉ. शिवानंद देवसरकर उपवैद्यकीय अधीक्षक, डॉ. अक्षय गव्हाणे वैद्यकीय अधिकारी तसेच विविध चिकित्सालयीन विभागांचे विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी, निवासी डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ, कर्मचारी व स्वयंसेवक यांनी समन्वयाने मोलाचे कार्य केले. त्यांच्या योगदानामुळे सर्व शिबिरे व आरोग्य उपक्रम यशस्वीपणे पार पडले.

# 'एमजीएम'मध्ये एचआर समिट- २०२६ कार्यक्रम उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात संचालिका डॉ.गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात नुकताच एचआर समीट - २०२६ चा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

एचआर समीट कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील दरी कमी करणे, उद्योगक्षेत्राच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा आणि संधींबाबत मार्गदर्शन करणे हा होता. या कार्यक्रमाला टेलीपरफॉर्मन्स, मॉडेल एन, आयटीडी टेक, ड्रायपील, सँकी सोल्युशन्स, टीसीएस, डासाल्ट सिस्टम, ओप्पो, होणारटेक आणि ॲशरे यांसारख्या नामांकित संस्थांमधील एचआर तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक टीपीओ प्रा. शिवप्रसाद तितरे यांनी केले. उद्घाटनपर भाषणात संचालिका डॉ. गीता लाठकर म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी परिस्थितीची आव्हाने स्वीकारून कार्य केले तरच यश मिळेल.

कार्यक्रमात विविध तज्ज्ञांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. यात त्यांनी कौशल्य विकास, बदलत्या परिस्थितीत जुळवून घेण्याची क्षमता आणि उद्योगाशी सुसंगत शिक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी उपप्राचार्य डॉ.शिरिष कोटगीरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. जी. सायगावी, मुंबई एमजीएमचे टीपीओ जाधव, विभागप्रमुख डॉ. अर्चना राजूरकर यांचीही समयोचित भाषणे झाली.

दुपारच्या सत्रात संगणकशास्त्र, यांत्रिकी, स्थापत्य आणि ईसीटी विभागांसाठी स्वतंत्र सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रांमध्ये विभागीय सादरीकरणे, विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण आणि उद्योग तज्ज्ञांसोबत संवाद यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत मौल्यवान मार्गदर्शन मिळवले.

या समीटचे योग्य नियोजन टीपीओ शिवप्रसाद तितरे यांच्यासह डिपार्टमेंट समन्वयक प्रा. ऐजाज अहमद, प्रा. पंकज पवार, प्रा. हिमांशु जोशी, प्रा. चंद्रशेखर बंदेला, प्रा. देविप्रसाद तुप्तेवार आणि प्रा. रितेश बैसे यांनी उत्कृष्ट समन्वयातून यशस्वी केले.

टीपीओ शिवप्रसाद तितरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अदिती माने व कु. उर्वशी सवाई यांनी केले.

# अंतर्मन

## श्रावणात पारद शिवलिंग घरी आणण्याचा विचार करताय?

### वास्तुतज्ज्ञांकडून जाणून घ्या स्थापना अन् पूजेचे नियम...

**वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रात पारद शिवलिंग अत्यंत पवित्र आणि शुभ मानले जाते. यंदाच्या श्रावणात घरात पारद शिवलिंगाची स्थापना करण्याचा विचार करत असाल, तर त्यापूर्वी काही महत्त्वाचे नियम जाणून घेणे आवश्यक आहे. पारद शिवलिंगाची स्थापना आणि पूजा योग्य पद्धतीने केल्यास शुभ फळ मिळते आणि कुटुंबीयांवर भगवान शिवांची कृपा राहते, अशी धार्मिक मान्यता आहे.**

### पारद शिवलिंग म्हणजे काय?

पारद शिवलिंगाला ज्योतिषशास्त्र आणि वास्तुशास्त्रात विशेष महत्त्व दिले जाते. हे शिवलिंग पारद आणि चांदीच्या मिश्रणापासून तयार केले जाते, असे मानले जाते. त्यामुळे ते अत्यंत पवित्र आणि प्रभावशाली मानले जाते. पारद शिवलिंगाची पूजा करताना काही नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे वास्तुतज्ज्ञ सांगतात. श्रावणात पारद शिवलिंग घरी आणण्यापूर्वी त्याची स्थापना कोणत्या दिशेला करावी, त्याची पूजा कशी करावी आणि कोणते पदार्थ अर्पण करावेत, याची माहिती घेणे महत्त्वाचे आहे.

### घरात पारद शिवलिंग ठेवण्याचे नियम

पारद शिवलिंग ठेवण्यासाठी मातीचे छोटे पात्र किंवा स्वच्छ ताट वापरावे, अशी मान्यता आहे. पारद शिवलिंग स्टील, तांबे किंवा चांदीच्या ताटातही ठेवता येते. त्याखाली स्वच्छ वस्त्र किंवा केळीचे पान ठेवावे. वास्तुतज्ज्ञांच्या मते, पारद शिवलिंग योग्य दिशेला ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वास्तुशास्त्रानुसार ते नेहमी पूर्व किंवा उत्तर दिशेला ठेवावे. या दिशा शुभ आणि पवित्र मानल्या जातात. घरात पूजा करताना शिवलिंगासमोर बसून पूजा करावी. मात्र, शिवलिंग कधीही थेट जमिनीवर ठेवू नये.



### काय अर्पण करावे, काय टाळावे?

- पीठ अर्पण करू शकता : पारद शिवलिंगाला गव्हाचे पीठ अर्पण करता येते, अशी मान्यता आहे. पीठ हे पृथ्वी तत्त्वाशी संबंधित मानले जाते. त्यामुळे ते भगवान शिवांना अर्पण करता येते.
- दही आणि साखर अर्पण करू नका : पारद शिवलिंगावर दही आणि साखर अर्पण करू नये. ही दोन्ही उत्पादने नैसर्गिक स्वरूपात न राहता विशिष्ट प्रक्रियेतून तयार केली जातात.

### पारद शिवलिंगाची सोपी पूजा पद्धत

घरात पारद शिवलिंगाची पूजा करताना त्यावर पाणी, दूध आणि गंगाजल अर्पण करावे, अशी मान्यता आहे. शक्य असल्यास शिवलिंगावर बेलपत्र आणि ताजी पांढरी फुले अवश्य अर्पण करावीत. बेलपत्र भगवान शिवांना अत्यंत प्रिय मानले जाते. पूजेच्या वेळी शिवलिंगावर चंदन अर्पण करणेही शुभ मानले जाते. पाणी, फुले आणि इतर पूजासाहित्य अर्पण केल्यानंतर शिवलिंगासमोर दिवा लावावा. त्यानंतर भगवान शिवांच्या 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप करावा. या मंत्रजपामुळे भगवान शिवांची कृपा प्राप्त होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

### पूजा झाल्यानंतर या गोष्टी लक्षात ठेवा

भगवान शिवांची विधिपूर्वक पूजा केल्यानंतर काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. शिवलिंगावर पाणी नेहमी हळूहळू आणि श्रद्धेने अर्पण करावे. अभिषेकानंतर ते पाणी एखाद्या झाडाच्या किंवा रोपाच्या मातीत सोडावे. हे पाणी कोणत्याही अस्वच्छ किंवा दूषित ठिकाणी टाकू नये. यंदाच्या श्रावणात घरात पारद शिवलिंग आणत असाल, तर त्याची स्थापना आणि पूजेचे हे नियम लक्षात घ्यावेत. तसेच नियमितपणे शिवलिंगाची विधीपूर्वक पूजा करावी. असे केल्याने कुटुंबावर भगवान शिवांची कृपादृष्टी कायम राहते, अशी धार्मिक मान्यता आहे.

## जिथे सन्मान असतो, तिथे नाती अधिक घट्ट होतात...

आजच्या 'जेन झी'च्या काळात अनेक नाती प्रेमाच्या कमतरतेमुळे नव्हे, तर एकमेकांबद्दलच्या सन्मानाच्या अभावामुळे कमकुवत होऊ लागतात. जेव्हा एखादी व्यक्ती समोरच्याच्या बोलण्याला किंवा भावनांना महत्त्व देणे थांबवते, तेव्हा मनामधील अंतर वाढू लागते. भगवान श्रीकृष्ण आणि सुदाम्याची मैत्री आपल्याला हेच शिकवते की खरी नाती पैसा, संपत्ती किंवा पदामुळे निर्माण होत नाहीत. ती निर्माण होतात परस्परांबद्दलच्या आदर, विश्वास आणि सन्मानामुळे.प्रेम आणि परिस्थिती काळानुसार बदलू शकतात. मात्र नात्यात एकमेकांबद्दलचा सन्मान कायम असेल, तर विश्वास कधीच संपत नाही. सन्मान नात्यांना तुटण्यापासून वाचवतो. कठीण परिस्थितीतही तो नात्याला आधार देतो आणि टिकवून ठेवतो. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा सन्मान तिचे पद, पैसा किंवा प्रतिष्ठा पाहून नव्हे, तर तिच्या स्वभाव, चारित्र्य आणि माणुसकीचा विचार करून केला पाहिजे.

- आजचा मंत्र : आज किमान एका व्यक्तीचे म्हणणे मध्येच न थांबवता पूर्णपणे ऐका. एखाद्या जुन्या मित्राशी कोणत्याही स्वार्थाशिवाय मनापासून संवाद साधा. घरात किंवा कामाच्या ठिकाणी एखाद्याने केलेल्या छोट्याशा योगदानाबद्दलही मनापासून 'धन्यवाद' म्हणा. इतरांबद्दलचा आदर आणि सन्मान कधीही कमी होऊ देऊ नका.
- आजचे आत्ममंथन : तुमच्या आयुष्यातही असे एखादे नाते आहे का, ज्यामध्ये एकमेकांबद्दलचा सन्मान कमी झाल्यामुळे दुरावा निर्माण झाला आहे? असे असेल, तर आजच त्या नात्यातील अंतर कमी करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याची योग्य वेळ आहे.

# श्रावणात रुद्राभिषेक कसा करावा?

## जाणून घ्या पूजासाहित्य, संपूर्ण विधी, मंत्र अन् धार्मिक महत्त्व



**श्रावण महिना भगवान शिवांना अत्यंत प्रिय मानला जातो. त्यामुळे या महिन्यात शिवलिंगावर अभिषेक आणि रुद्राभिषेक करण्याला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. श्रावणातील कोणत्याही दिवशी रुद्राभिषेक केल्यास शुभ फळ मिळते, अशी श्रद्धा आहे. 'रुद्राभिषेक' म्हणजे रुद्रमंत्रांचा जप करत भगवान शिवांचा अभिषेक करणे. 'रुद्र' हे भगवान शिवांचेच एक रूप मानले जाते. त्यामुळे श्रावण महिन्यात रुद्राभिषेकाचे महत्त्व अधिक वाढते, अशी धार्मिक मान्यता आहे. रुद्राभिषेक केल्याने पापांचा नाश होतो आणि भगवान शिवांची विशेष कृपादृष्टी प्राप्त होते, असे मानले जाते. मात्र रुद्राभिषेक पूर्ण विधीपूर्वक करण्यासाठी आवश्यक पूजासाहित्य, योग्य पद्धत आणि मंत्र यांची माहिती असणे महत्त्वाचे आहे. चला, जाणून घेऊया रुद्राभिषेकाची संपूर्ण पद्धत, पूजासाहित्य, मंत्र आणि धार्मिक मान्यता...**

### रुद्राभिषेकासाठी आवश्यक पूजासाहित्य

पितळ किंवा अन्य धातूपासून तयार केलेली शृंगी (अभिषेक पात्र), पाणी ठेवण्यासाठी बादली किंवा मोठे पात्र, तांब्याचे पात्र, गंगाजल, शिवलिंग, शुद्ध पाणी, दूध, दही, कुंकू, फुले, पंचामृत, उसाचा रस, मौली (नाडा), मोहरीचे तेल, हरभऱ्याची डाळ, काळे तीळ, मध मिसळलेले गंगाजल, तूप, कुंकू व केशर मिश्रित जल, चंदन, विड्याचे पान, धूप, बेलपत्र, कापूर, मिठाई, सुकामेवा, गुलाबपाणी.

### रुद्राभिषेकाची पद्धत आणि मंत्र

- रुद्राभिषेक करताना जल, दूध, मध आदी पदार्थांनी शिवलिंगाचा अभिषेक केला जातो. प्रत्येक वेळी वापरल्या जाणाऱ्या पात्राला कुंकवाचा टिळा लावावा. नाडा बांधताना संबंधित मंत्राचा जप करावा. फुले अर्पण करताना पंचाक्षरी मंत्र 'ॐ नमः शिवाय' याचा जप करावा. एका पदार्थाने अभिषेक पूर्ण झाल्यानंतर शिवलिंग स्वच्छ वस्त्राने पुसावे आणि त्यानंतर पुढील पदार्थाने अभिषेक करावा.
- जलाभिषेक : मनात भगवान शिवांच्या बालरूपाचे ध्यान करावे. तांब्याव्यतिरिक्त अन्य पात्रात शुद्ध पाणी घ्यावे आणि त्या पात्राला कुंकवाचा टिळा लावावा. यानंतर 'ॐ इन्द्राय नमः' या मंत्राचा जप करत पात्राला नाडा बांधावा. त्यानंतर 'ॐ नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राचा जप करत फुले अर्पण करावीत. यानंतर शिवलिंगावर पाण्याची अखंड किंवा बारीक धार सोडत रुद्राभिषेक सुरू करावा. यावेळी 'ॐ तं त्रिलोकीनाथाय स्वाहा' या मंत्राचा जप करावा.
- दूधाने अभिषेक : शिवलिंग स्वच्छ वस्त्राने व्यवस्थित पुसून घ्यावे आणि भगवान शिवांच्या प्रकाशमय स्वरूपाचे ध्यान करावे. पात्रात दूध घेऊन त्याला कुंकवाचा टिळा लावावा. त्यानंतर 'ॐ श्री कामधेनवे नमः' या मंत्राचा जप करत मौली बांधावी. फुले अर्पण करून पंचाक्षरी मंत्राचा जप करावा आणि त्यानंतर दूधाने शिवलिंगाचा अभिषेक करावा. या वेळी 'ॐ सकललोकैकगुरवे नमः' या मंत्राचा जप करावा.
- उसाच्या रसाने अभिषेक : भगवान शिवांच्या नीलकंठ स्वरूपाचे ध्यान करावे. तांब्याच्या पात्रात उसाचा रस घ्यावा. पात्राला कुंकवाचा टिळा लावून 'ॐ कुबेराय नमः' या मंत्राचा जप करत मौली बांधावी. फुले अर्पण केल्यानंतर उसाच्या रसाने शिवलिंगाचा अभिषेक करावा. यावेळी 'ॐ ह्रुं नीलकंठाय स्वाहा' या मंत्राचा जप करावा.
- मोहरीच्या तेलाने अभिषेक : भगवान शिवांच्या प्रलयंकर स्वरूपाचे स्मरण करावे. तांब्याच्या पात्रात मोहरीचे तेल घ्यावे. टिळा लावताना 'ॐ भं भैरवाय नमः' या मंत्राचा जप करावा. यानंतर मोहरीच्या तेलाची बारीक धार शिवलिंगावर सोडत अभिषेक करावा. यावेळी 'ॐ नाथनाथाय नाथाय स्वाहा' या मंत्राचा जप करावा.
- हरभऱ्याच्या डाळीने अभिषेक : भगवान शिवांच्या समाधिस्थ स्वरूपाचे मनोमन ध्यान करावे. तांब्याच्या पात्रात हरभऱ्याची डाळ घ्यावी. पात्राच्या सर्व बाजूंना कुंकवाचा टिळा लावून मौली बांधावी आणि 'ॐ यक्षनाथाय नमः' या मंत्राचा जप करावा. यानंतर हरभऱ्याच्या डाळीचा अभिषेक करावा. यावेळी 'ॐ शं शम्भवाय नमः' या मंत्राचा जप करावा.
- काळ्या तिळांनी अभिषेक : भगवान शिवांच्या नीलवर्ण स्वरूपाचे ध्यान करावे. तांब्याच्या पात्रात काळे तीळ घ्यावेत. त्यावर 'ॐ हुं कालेश्वराय नमः' या मंत्राचा जप करत मौली बांधावी. यानंतर शिवलिंगावर काळ्या तिळांनी अभिषेक करावा आणि 'ॐ क्षौं ह्रौं हुं शिवाय नमः' या मंत्राचा जप करावा.
- मधमिश्रित गंगाजलाने अभिषेक : भगवान शिवांच्या चंद्रमौलेश्वर स्वरूपाचे ध्यान करावे. तांब्याच्या पात्रात मध मिसळलेले गंगाजल घ्यावे. 'ॐ चन्द्रमसे नमः' या मंत्राचा जप करत पात्राला मौली बांधावी. रुद्राभिषेकाच्या वेळी 'ॐ वं चन्द्रमौलेश्वराय स्वाहा' या मंत्राचा जप करावा.
- तूप आणि मधाने अभिषेक : भगवान शिवांच्या त्र्यंबक स्वरूपाचे स्मरण करावे. तांब्याच्या पात्रात तूप आणि मध घ्यावे. मौली बांधताना 'ॐ धन्वन्तरये नमः' या मंत्राचा जप करावा.
- तूप आणि मधाने अभिषेक करताना 'ॐ ह्रौं जूं सः त्र्यंबकाय स्वाहा' या मंत्राचा जप करावा.
- कुंकू, केशर आणि पंचामृत मिश्रित जलाने अभिषेक : भगवान शिवांच्या नीलकंठ स्वरूपाचे ध्यान करावे. चांदीच्या किंवा स्टीलच्या पात्रात कुंकू, केशर आणि पंचामृत मिश्रित जल घ्यावे. पात्राला मौली बांधताना 'ॐ उमायै नमः' या मंत्राचा जप करावा. त्यानंतर अभिषेक सुरू करावा. यावेळी 'ॐ ह्रौं ह्रौं ह्रौं नीलकंठाय स्वाहा' या मंत्राचा जप करावा.

### वेगवेगळे पदार्थ वापरण्याचे धार्मिक लाभ

- रुद्राभिषेकामध्ये वेगवेगळ्या पदार्थांचा वापर केल्याने वेगवेगळे धार्मिक लाभ मिळतात, अशी मान्यता आहे.
- दूधाने अभिषेक : भगवान शिव प्रसन्न होतात आणि साधकाला त्यांची विशेष कृपा प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.
- जलाभिषेक : पाण्याने शिवलिंगाचा अभिषेक करणे शुभ मानले जाते. यामुळे जीवनातील दुःख आणि अडचणी दूर होतात, अशी मान्यता आहे.
- उसाच्या रसाने अभिषेक : कर्जमुक्ती आणि धनलाभाचे योग निर्माण होतात, असे मानले जाते.
- मोहरीच्या तेलाने अभिषेक : ग्रहबाधा असल्यास हा अभिषेक शुभ मानला जातो. त्यामुळे ग्रहदोषांचा प्रभाव कमी होतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे.
- हरभऱ्याच्या डाळीने अभिषेक : नवीन शुभ कार्याची सुरुवात आणि व्यवसायातील प्रगतीसाठी हा अभिषेक फलदायी मानला जातो.
- काळ्या तिळांनी अभिषेक : तांत्रिक अडथळे दूर होतात आणि वाईट नजर व नकारात्मक प्रभावापासून संरक्षण मिळते, अशी मान्यता आहे.
- मधमिश्रित गंगाजलाने अभिषेक : कुटुंबात सुख-शांती आणि समृद्धी टिकून राहते. तसेच संततीप्राप्तीसाठीही हा अभिषेक शुभ मानला जातो.
- तूप आणि मधाने अभिषेक : रोगांपासून मुक्ती आणि दीर्घायुष्य मिळते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.
- कुंकू, केशर आणि पंचामृताने अभिषेक : व्यक्तिमत्त्वात आकर्षण आणि सकारात्मकता वाढण्यासाठी हा अभिषेक फलदायी मानला जातो.

### रुद्राभिषेकाची संपूर्ण पूजा प्रक्रिया

धार्मिक मान्यतेनुसार रुद्राभिषेकाची विस्तृत पूजा काही ठिकाणी होम किंवा अग्नीयज्ञाच्या विधीनंतर केली जाते. हा विधी प्रामुख्याने जाणकार किंवा पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली केला जातो. या विधीत शिवलिंगाचे मुख उत्तर दिशेकडे ठेवले जाते, तर साधक पूर्वेकडे तोंड करून बसतो. त्यानंतर गंगाजलाने अभिषेकास सुरुवात केली जाते. यानंतर विविध पदार्थांनी अभिषेक करताना प्रत्येक टप्प्यावर शिवलिंगाला त्या पदार्थाने स्नान घातले जाते आणि आवश्यक पूजासाहित्य अर्पण केले जाते. अभिषेक पूर्ण झाल्यानंतर भगवान शिवांना मिठाई आणि विविध नैवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर विधीपूर्वक भगवान शिवांची आरती करावी. शेवटी अभिषेकासाठी वापरलेले गंगाजल उपस्थितांवर शिंपडले जाते आणि



प्रसादरूपाने वाटले जाते. या गंगाजलाचे सेवन केल्याने पापांचा क्षय होतो आणि आरोग्यवृद्धी होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. रुद्राभिषेकादरम्यान संपूर्ण वेळ रुद्राध्याय किंवा 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप केला जातो.

# श्रावणात भगवान शिवांना कोणती फुले अर्पण करावीत?

## शिवपुराणात सांगितले आहे महादेवांची प्रिय फुले




**देवाधिदेव महादेव हे अत्यंत शीघ्र प्रसन्न होणारे देवता मानले जातात. भगवान शिवांची आराधना केल्याने मनोकामना पूर्ण होतात आणि मोक्षप्राप्ती होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. श्रावण महिना भगवान शिवांच्या उपासनेसाठी विशेष मानला जातो. श्रावणात भगवान शिवांची पूजा केल्याने धन-धान्य, संतती, सुख-समृद्धी आणि आनंद प्राप्त होतो, अशी मान्यता आहे. या काळात शिवलिंगाला विविध फुले अर्पण करण्याचीही परंपरा आहे. शिवपुराणानुसार, भगवान शिवांना काही फुले अर्पण करणे शुभ मानले जाते.**

- धोतऱ्याचे फुल : शिवपुराणानुसार भगवान शिवांना धोतऱ्याचे फुल अर्पण करावे. असे केल्याने संततीप्राप्तीची इच्छा पूर्ण होते, अशी मान्यता आहे. विशेषतः लाल देठ असलेला धोतरा पूजेसाठी अत्यंत शुभ मानला जातो.
- पांढरे रूईचे फुल आणि पांढरे कमळ : भगवान शिवांना पांढऱ्या रूईचे फुल आणि पांढरे कमळ अर्पण केल्याने मोक्षप्राप्ती होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.
- करवीराची फुले : शिवपुराणानुसार, भगवान शिवांची एक लाख करवीराच्या फुलांनी पूजा केल्यास रोग आणि विविध प्रकारचे कष्ट दूर होतात, अशी मान्यता आहे.
- चमेली आणि जवसाची फुले : श्रावणातील शिवरात्रीच्या दिवशी भगवान शिवांना चमेलीची फुले अर्पण केल्यास सुख, समृद्धी आणि वाहनसुख प्राप्त होते, असे मानले जाते. तसेच जवसाची फुले अर्पण करून भगवान शिवांची पूजा केल्यास भगवान शिवांसह भगवान विष्णूंचाही आशीर्वाद प्राप्त होतो, अशी धार्मिक मान्यता आहे.
- पारिजातक, रूई फुल, बेल अन् मोगरा : भगवान शिवांना पारिजातक आणि रूईची फुले अर्पण केल्याने

### ही फुले अर्पण करा...

घरात सुख-समृद्धी नांदते आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण राहते, असे मानले जाते. याशिवाय बेल आणि सुगंधी मोगऱ्याची फुले भगवान शिव तसेच माता पार्वती यांना अर्पण केल्याने दुःख आणि दारिद्र्य दूर होते, अशी श्रद्धा आहे. तसेच वैवाहिक जीवनात प्रेम, जिव्हाळा आणि मधुरता वाढते, असेही मानले जाते.

- हातगा आणि पिवळ्या कण्हेरीचे फूल : भगवान शिवांना हातग्याचे फूल आणि पिवळ्या कण्हेरीचे फूल अर्पण केल्याने ज्ञान, समृद्धी आणि गुरुकृपा प्राप्त होते, अशी मान्यता आहे. या फुलांच्या पूजेमुळे मान-सन्मान आणि कीर्तीमध्ये वाढ होते, असेही धार्मिक ग्रंथांमध्ये सांगितले आहे.



# कर्जमाफीच्या पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ शेतकऱ्यांची यादी जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र सरकारच्या सहकार विभागाकडून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतची कर्जमुक्ती जाहीर करण्यात आलेली आहे. राज्य सरकारकडून या योजनेमध्ये २ लाखांपर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, यामध्ये वन टाईम सेटलमेंट आणि प्रोत्साहनपर अनुदान याचा देखील समावेश आहे. पहिल्या यादीतील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ घ्यायचा असल्यास ग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण करावं लागणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी अगोदर



ग्रीस्टॅकवर नोंदणी केली असेल त्यांना आधार प्रमाणीकरण करावं लागेल.

कर्जमाफीच्या पहिल्या टप्प्यात १६ लाख ९७ हजार शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना याचा लाभ मिळवण्यासाठी ग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये ७.०३ लाख शेतकरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे, तर ९.९३ लाख शेतकरी व्यापारी व राष्ट्रीयकृत बँकांचे असून, एकूण १३३३६ कोटींच्या कर्जमुक्तीचा समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्जखाते अनुत्पादित (एनपीए) झाले असल्यास, बँकांना थकीत कालावधीच्या टप्प्यानुसार विशेष सवलत (हेअर कट) दिली जाणार आहे.

कर्जमाफीच्या पोर्टलवर दिसणारी रक्कम मान्य असल्यास शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण करावे. प्रमाणीकरण यशस्वी झाल्यावर त्यांना कर्जमुक्तीच्या रकमेची माहिती असलेली पावती मिळेल. ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या कर्जबाकीच्या लाभाची रक्कम डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाईल. कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यास 'कर्ज बेबाकी प्रमाणपत्र' देण्यात येईल. यानंतर या सर्व शेतकऱ्यांना बँकेमार्फत आगामी खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्जाची उपलब्धता होईल. कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या बँकांच्या शाखा आणि विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये लावल्या जातील. ज्या शेतकऱ्यांना आपल्या पात्रतेबाबत अथवा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात काही तक्रार अथवा शंका असेल, त्यांनी जिल्हास्तरीय समितीकडे तक्रार नोंदवावी. अथवा हेल्पलाईनवर संपर्क करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

# पुण्यातील पेठाही आता 'एफडीए'च्या रडारावर; ४ दिवसांत ४५ लाख ७० हजार अन्नसाठा जप्त

**पुणे (प्रतिनिधी)** – अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात गेल्या काही महिन्यात एफडीएने कारवाईचा धडाका लावला असून अगदी पान टपऱ्यांपासून ते पंचतारांकीत हॉटेलपर्यंतच्या आस्थापनांवर कारवाई केली जात आहे. त्याच अनुषंगाने आता पुण्यातील पेठाही ऋऊ च्या रडारावर असल्याची माहिती समोर आली आहे. कारण पुण्यातील पेठांमध्ये अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत अनेक मिठाईच्या दुकानांवर छापा टाकला आहे. तर शहरातील ५ हॉटेलचे परवाने देखील निलंबित करण्यात आल्याची माहिती आहे. तसेच पुण्यासह सातारा आणि सांगलीमध्ये देखील ऋऊ कडून कारवाई करण्यात आली आहे.

अन्नातील भेसळ, निकृष्ट दर्जा आणि अन्न सुरक्षा नियमांच्या उल्लंघनाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने पुणे विभागात





मोठी कारवाई करून ४ दिवसांत ४५ लाख ७० हजार १६८ रुपयांचा संशयित निकृष्ट, असुरक्षित आणि चुकीच्या लेबलिंगचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. तर ऋऊ ने २४ ते २७ जुलैदरम्यान राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत पुणे शहरातील गणेश पेठ व नाना पेठ परिसरातील घाऊक व्यापाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले. तपासणीदरम्यान मिठाई, कँडी, चॉकलेट, सुका मेवा, मसाले, फरसाण आदी अन्नपदार्थ संशयित निकृष्ट, असुरक्षित, चुकीच्या लेबलिंगचे किंवा परवान्याशिवाय साठविल्याचे आढळले. त्यानंतर संपूर्ण साठा जप्त करून नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. अहवालानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यासह पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात देखील कारवाई करत कुल्फी उत्पादन केंद्राच परवाना रद्द करण्यात आला आहे. तर तिकडे पुण्यासह सातारा आणि सांगली देखील अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली आहे.

# एकनाथ खडसे, रक्षा खडसेंविषयी कथित ऑडियोमध्ये शिवराळ भाषेचा वापर

### राजकीय वर्तुळात खळबळ

**मुंबई (प्रतिनिधी)** – भारतीय जनता पक्षाचे उत्तर महाराष्ट्र संयोजक विजय चौधरी आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यातील संभाषणाची एक कथित ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या कथित ऑडिओ क्लिपमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि त्यांच्या सून तथा केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याबाबत अत्यंत आक्षेपार्ह व भाषेचा वापर करण्यात आल्याचा दावा केला जात आहे.

या धक्कादायक प्रकारामुळे भाजपमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले असून राज्याच्या राजकारणात प्रचंड



खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे रक्षा खडसे या सध्या केंद्र सरकारमध्ये मंत्री म्हणून कार्यरत आहेत, तर दुसरीकडे एकनाथ खडसे सातत्याने भाजपच्या स्थानिक व राज्यस्तरीय नेत्यांवर टीका करत असतात. अशा परिस्थितीत उत्तर महाराष्ट्रातील भाजपच्या दोन मोठ्या नेत्यांमधील हे कथित संभाषण बाहेर आल्यामुळे राजकीय वर्तुळाचे या प्रकरणाकडे लक्ष लागले आहे. या ऑडिओ क्लिपवर आता संबंधित

# राजधानीत दर्जेदार मराठी चित्रपटांची मेजवानी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज महाराष्ट्र सदन येथे झालेल्या बैठकीत देशाच्या राजधानीत प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या दिल्ली मराठी चित्रपट महोत्सवाच्या पूर्वतयारीचा आणि नियोजनाचा आढावा घेतला. दिल्ली मराठी प्रतिष्ठानतर्फे जनपथ येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरमध्ये ७ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवाच्या माध्यमातून मराठी चित्रपटसृष्टीची सांस्कृतिक समृद्धी राष्ट्रीय पातळीवर प्रभावीपणे पोहोचविण्यात येणार आहे.

या बैठकीस महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव श्वेता सिंघल, दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे वैभव डांगे, विवेक गर्गे, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी नितीन सरदारे, अभिजित गोडबोले, रामदास चव्हाणके आणि राजकुमार महाजन उपस्थित होते. चित्रपट प्रदर्शन, मान्यवरांचे स्वागत, प्रेक्षक व्यवस्थापन, नोंदणी प्रक्रिया, तांत्रिक सुविधा, प्रसिद्धी, सुरक्षा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन या सर्व बाबींचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. महोत्सवाचे आयोजन उच्च दर्जाचे आणि संस्मरणीय व्हावे, यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या सूचना मंत्री शेलार यांनी संबंधितांना दिल्या. दिल्लीच्या सांस्कृतिक विश्वात मराठी चित्रपटसृष्टीचा ठसा अधिक ठळक करणारा आणि मराठी सिनेमाला राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात हा महोत्सव यशस्वी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. 'सिनेमा संस्कृती संवाद' या संकल्पनेवर आधारित हा तीन दिवसीय महोत्सव मराठी चित्रपटांच्या आशयवैविध्याची ओळख देशभरातील रसिकांना करून देणारा ठरणार



आहे. महोत्सवाची सुरुवात बहुप्रतीक्षित 'देऊळ बंद -२' या चित्रपटाच्या विशेष प्रदर्शनाने होणार असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव मिळविलेल्या 'स्थळ', 'घबाडखुंड' यांसह विविध दर्जे दार मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहेत. इतर भाषिक प्रेक्षकांनाही मराठी चित्रपटांचा आनंद घेता यावा यासाठी सर्व चित्रपट इंग्रजी उपशीर्षकांसह दाखविण्यात येणार आहेत.

चित्रपट प्रदर्शनाबरोबरच चित्रपटसृष्टीतील नामवंत अभिनेते, दिग्दर्शक, लेखक आणि तंत्रज्ञ यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधीही रसिकांना मिळणार आहे. भीम सभागृहात उद्घाटन, समारोप आणि प्रमुख चित्रपटांचे प्रदर्शन होईल, तर नालंदा सभागृहात पटकथा लेखन, अभिनय आणि दिग्दर्शन या विषयांवरील मास्टरक्लास आणि कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. समरसता सभागृहात माहितीपट आणि लघुपटांचे प्रदर्शन होणार असून, मराठी चित्रपटसृष्टीच्या विविध पैलूंवर चर्चासत्रेही आयोजित करण्यात येणार आहेत.

# एफडिएचे पथक थेट हायकोर्टाच्या कँटिंनमध्ये; अधिकृत नोंदणीच नाही

**मुंबई (प्रतिनिधी)** – अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या विभागाला मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयानं कारवाई संदर्भात प्रश्न विचारले होते. सरकारी आस्थापनांमधील उपहारगृहांसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएला प्रश्न विचारताच एफडीएचं पथक आज उच्च न्यायालयात दाखल झालं. मुंबई उच्च न्यायालयाच्या आवारातील उपहारगृहांची तपासणी एफडीएकडून सुरू करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाकडून केलेल्या तपासणी दरम्यान उच्च न्यायालयातील एका उपहारगृहाची नोंदणीच झाली नसल्याचं स्पष्ट झालं. नियमानुसार नोंदणी नसलेल्या उपहारगृहांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. अन्न व औषध प्रशासनानं मुंबई उच्च न्यायालयाच्या परिसरातील कँटिंनची तपासणी केल्यानं या कारवाईची चर्चा रंगली आहे. मुंबई हायकोर्टानं मंगळावरी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने खाजगी आस्थापनांवर कारवाईचा धडाका लावणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाई पद्धतीवरच प्रश्चिन्ह उपस्थित केले होते. आजवर किती मंत्रांच्या आणि सरकारी आस्थापनांवर छापे टाकले अशी विचारणा करत मंत्रालयासह उच्च न्यायालय, सरकारी आणि निमसरकारी आस्थापनांचीही तातडीने तपासणी करण्याचे आदेश दिले होते.

# महाराष्ट्र महसूल व वन विभागात नोकरीचे आमिष, युवकाची तब्बल ७० लाखांची फसवणूक, तीन आरोपींना अटक

**ठाणे (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागात 'लिपीक टंकलेखक' पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका २८ वर्षीय तरुणाची तब्बल ७० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तीन आरोपींना ठाणे गुन्हे शाखेच्या घटक-२ (भिवंडी) पथकाने गजाआड केले आहे. आरोपींकडून मंत्रालयातील वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांचे बनावट सही-शिक्के, लेटरहेड आणि बनावट नियुक्तीपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

भिवंडीतील काल्हेर गावचे रहिवासी तक्रारदार दर्शन संतोष पाटील (वय २८) यांना आरोपी शाम विठोबा खतकर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बनावट सही-शिक्के असलेली पत्रे दाखवून विश्वासात घेतले. आरोपींनी पाटील यांच्याकडून ७० लाख रुपये



ऑनलाईन व रोखीने उकळून त्यांना लिपीक पदाचे बनावट नियुक्तीपत्र व ओळखपत्र दिले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन भिवंडी गुन्हे शाखेने तपास चक्र फिरवून पुढील कारवाई करीत आहे. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, हे तिन्ही आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. मुख्य आरोपी शाम खतकर याच्यावर मुंबईतील एमएचबी, काशिमीरा, कोपरी, दादर, कफ परेड अशा विविध पोलीस ठाण्यांमध्ये फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार करण्याचे अनेक गुन्हे दाखल आहेत. तर जुगल लोडाया आणि रविंद्र शंखुआ यांच्यावरही वर्तकनगर आणि हिंगोली येथे अशाच प्रकारचे गुन्हे नोंद आहेत. सदर कारवाई ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस सह आयुक्त डॉ. पंजाबराव उगले आणि गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत व त्यांच्या पथकाने केली.

# एकाच शर्यतीत जिंकली भारताने २ सुवर्ण पदक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारतीय पॅरा थलीट्स आणि खेळाडूंनी आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर इतिहास रचला आहे. पुरुषांच्या १०० मीटर टी-४७ फायनल शर्यतीत भारताने एकाच वेळी सुवर्ण आणि रौप्य अशा दोन्ही पदकांवर आपले नाव कोरले. तर दुसरीकडे पुरुषांच्या लांब उडीत मुरली श्रीशंकरने रौप्य पदक पटकावले आहे.

पुरुषांच्या १०० मीटर टी-४७ फायनलमध्ये भारतीय धावपटूंनी अप्रतिम कौशल्याचे प्रदर्शन केले. शर्यतीदरम्यान दिलीप गावीत एका टप्प्यावर चौथ्या क्रमांकावर घसरला होता. मात्र, अखेरच्या काही सेकंदांत त्याने दाखवलेला जबरदस्त वेग सर्वांना थक्क करणारा ठरला. दिलीप गावीतने १०.७१ सेकंदाची वेळ नोंदवत थेट पहिले स्थान पटकावले आणि सुवर्ण पदक आपल्या नावे केले. याच शर्यतीत भारताच्या मोहम्मद बासिल एम यानेही उत्तम कामगिरी केली.

# बस ड्रायव्हरच्या घरात सापडला ५० कोटींचा खजिना

**कोलकाता (वृत्तसंस्था)** – पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यात पोलिसांनी केलेल्या धाडीत तब्बल २८.५ कोटी रुपयांची रोकड आणि १५ किलो सोने जप्त केले आहे. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत सुमारे २१.५ कोटी रुपये असल्याचा अंदाज असून एकूण जप्तीची रक्कम जवळपास ५० कोटी रुपये इतकी आहे. विशेष म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणावर रोकड सापडल्याने ती मोजताना पाच चलन मोजणी यंत्रे (करन्सी काउंटिंग मशीन) बंद पडली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणात पोलिसांनी मिनार मंडल याला अटक केली आहे. तो पूर्वी राज्य परिवहन विभागात बस चालक म्हणून कार्यरत होता. त्यानंतर तो दगड (स्टोन) व्यवसायाशी संबंधित झाला. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार तो फरार असलेला दगड व्यावसायिक तुलू मंडल उर्फ मोहम्मद नजीबुद्दीन याचा व्यवस्थापक (मॅनेजर) आणि मेहुणा आहे.

तुलू मंडल हे नाव यापूर्वीही चर्चेत आले होते. २०२४ मध्ये त्याने आपल्या मुलीच्या विवाहावर जवळपास १०० कोटी रुपये खर्च केल्याचा दावा करण्यात आला होता. त्या आलिशान विवाहसोहळ्याला बंगाली चित्रपटसृष्टीतील कलाकारांसह बॉलिवूड अभिनेता अरबाज खान आणि अभिनेत्री झरीन खान यांनीही उपस्थिती लावल्याची चर्चा होती.



पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनंतर बुधवारी रात्री मिनार मंडलच्या घरावर छापा टाकण्यात आला. सुरुवातीला सुमारे २० कोटी रुपयांची रोकड सापडली होती. मात्र संपूर्ण रात्रभर सुरू असलेल्या मोजणीनंतर ही रक्कम २८.५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. एवढ्या मोठ्या प्रमाणातील नोटा लोखंडी पेट्यांमध्ये भरून मोहम्मद बाजार पोलीस ठाण्यात नेण्यात आल्या. त्यानंतर ही रोकड बँकेत जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. जप्त करण्यात आलेली रोकड दगड खाणींमधून वसूल करण्यात आलेल्या सरकारी महसुलाशी संबंधित असू शकते. हा महसूल सरकारी तिजोरीत जमा करण्याऐवजी त्याचा अपहार करण्यात आल्याची शक्यता तपासली जात आहे. माहितीनुसार २०१६-१७ च्या सुमारास तुलू मंडलकडे बीरभूम जिल्ह्यातील स्टोन क्वारीमधील डीसीआर वसुलीची जबाबदारी होती.


**e-Tender Notice**

अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

ई-निविदा क्र. 04/2026-27 निविदा (जि. नांदेड) 1st call

निविदा

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना-टप्पा-2 (बॅच-1) सन 2024-25 संशोधन व विकास कार्यक्रम ( R & D) अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर,मुदखेड,भोकर या तालुक्यातील रस्त्यांच्या दर्जोन्नती अंतर्गत पॅकेज क्र. RD-NDD-A085(A) व RD-NDD-A085(B) (एकुण कामांची संख्या-09) मधील रस्त्यांच्या कामांच्या व 10 वर्ष देखभाल दुरुस्ती कामाच्या निवीदा दिनांक 30-07-2026 रोजी सकाळी 11.00 वा. पासून दिनांक 07-08-2026 सायंकाळी 17.30 वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

टीप: यापुढील सर्व आवश्यक सूचना /शुद्धीपत्रक हे Online website वर प्रसिद्ध करण्यात येतील.

स्वाक्षरीत
( कृष्णा सं.मते )
कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो)
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नांदेड

स्वाक्षरीत
(विनोद भदाणे)
अधीक्षक अभियंता (प्रमंग्रासयो)
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, छ.संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

## Change In Name

My Old Name is **SULAIMAN SAIF KHAN AKBAR KHAN** which now I am Changing as New Name **SULEMAN SAIF KHAN.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - H.No. 1-4-1067, Pirburhan Nagar, Galli No. 13, Nagar Galli No. 13, Nanded 431605 Mo.No. 8983800143**

## Change In Name

My Old Name is **FARHEEN BEGUM** which now I am Changing as New Name **FARHEEN BEGUM SHAIKH MINHAJODDIN.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - H.No. 9-4-940, Degloor Naka Road, Madeena Nagar, Itwara Nanded 431604 Mo.No. 9860081032**

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती हि. का. शेळके, धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड. यांचे न्यायालयात (महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम-१९५० चे कलम ३६ अ (३) अन्वये

दिपगंगा मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड ता. जि. नांदेड नोंद.क्र. एफ-७३४५ (नांदेड) या न्यासाने न्यासाच्या मार्फत चालविले जाणारे कॉलेज श्रीगुरु गोविंदसिंग मेमोरीयल स्कुल ऑल नर्सिंग, धनगरवाडी ता. जि. नांदेड या युनिटला शासनाकडुन मुलाचे इबीसीची रक्कम मिळेपर्यंत कॉलेज मधील कर्मचाऱ्यास लागणारा दरमहा पगार देण्यासाठी, श्रीवेद मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड, शाखा आनंदनगर, नांदेड यांच्याकडून रु. २,५०,०००/- (अक्षरी दोन कोटी पन्नास लाख रुपये) कर्ज घेत आहेत. त्यास मंजुरी मिळावी करिता अर्ज क्र. ०५/२०२६ कलम ३६ अ (३) प्रकरणाबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. दिपगंगा मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड ता.जि. नांदेड नोंद.क्र. एक-७३४५ (नांदेड) या न्यासाने न्यासाच्या मार्फत चालविले जाणारे कॉलेज श्रीगुरु गोविंदसिंग मेमोरीयल स्कुल ऑल नर्सिंग, धनगरवाडी ता. जि. नांदेड या संस्थेच्या युनिटला सरकारकडुन मुलाचे इबीसीची रक्कम मिळेपर्यंत कॉलेज मधील कर्मचाऱ्यास लागणारा दरमहा पगार देण्यासाठी श्रीवेद मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमीटेड, शाखा आनंदनगर, नांदेड यांच्याकडून रु. २,५०,०००/- अक्षरी दोन कोटी पन्नास हजार रुपये) कर्ज घेत आहेत. त्या कर्जास महाराष्ट्र सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा १९५० चे कलम ३६ अ (३) प्रमाणे मंजुरी मिळावी म्हणुन अर्ज दाखल केलेला आहे.

सदरील प्रस्ताव हा मा. धर्मादय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या कार्यालयात दाखल करण्यात आलेला असुन यात दि. २८.०७.२०२६ रोजी झालेल्या मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांचे आदेशान्वये प्रस्तावास कोणासही आक्षेप असल्यास संबंधित कागदपत्रासह लेखी स्वरूपात दि. ०४.०९.२०२६ पूर्वी नांदेड कार्यालयात सादर करावा.

आज दि. २९.०७.२०२६ रोजी माझे सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

आदेशावरून.
बा.बी. गंगावणे

प्र. अधिक्षक
सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय
नांदेड विभाग नांदेड

## Change In Name

My Old Name is **MEHJABEEN** which now I am Changing as New Name **MAHEJABEEN SYED RAFEEQ.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - H.No. 7-3-1149 , New Keli Market , Raza Nagar, Itwara Nanded Po - Itwara Nanded , Maharashtra -431604**

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार रोहीत पि. रामराव मंगनाळे रा. फ्लॅट डी ७०३, श्रीजी विहार सोसायटी, पिंपळे सौदागर, पुणे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटण देण्यात येते की, आमच्या पक्षकाराने सदाशीव पि. व्यंकटराव पुंड रा. पिंपळगाव, ता. जि. नांदेड व अनिल पि. वसंतराव पाटील रा. नरहर नगर, नांदेड ता. जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील ग्रामपंचायत कोंढा मौजे कोंढा ता. अर्धापुर जि. नांदेड पैकी मौजे. कोंढा येथील शेत गट नंबर 373 आहे. शेत नामे [वाघमारी] आहे. क्षेत्रफळ 4 हेक्टर 82 आर आकार 17 रु 14 पैसे, पैकी त्यांच्या हिस्स्याचे 1 हेक्टर 00 आर जिरायतीचे शेत आमचे पक्षकारास कायमचे विक्री करण्याचा सौदा केला आहे. ज्याची चतुः सिमा, पूर्वेस :- सरकारी पांदण आहे पश्चिमेस :- सीताराम नागोजी व सखाराम नागोजी यांची जमीन आहे दक्षिणेस :- अनिल पाटील व रविशंकर नेरनाळे यांची जमीन आहे उत्तरेस :- बाबुराव कदम यांची जमीन आहे येणे प्रमाणे चतुर्सिमेच्या आतील मिळकत विकत घेण्याचा/हस्तांतर करण्याचा सौदा/करार केला आहे व करारापोटी ईसारा रक्कम पण दिली आहे. तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटणाद्वारे सुचित करण्यात येते की, कोणास सदरील मिळकतीबाबत किंवा सदरील व्यवहाराबाबत काहीही आक्षेप असल्यास त्यांनी आपला लेखी आक्षेप संबंधीत कागदपत्रासह हे जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या तारखेपासून 7 दिवसाच्या आत खालील पत्यावर नोंदवावा. मुदतीत कोणाचे काही आक्षेप न आल्यास आमचे पक्षकार सदरील मिळकतीचा चा व्यवहार पुर्ण करून रितसर खरेदीखत / हस्तांतरण करून घेतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत. करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार;
रोहीत पि. रामराव मंगनाळे
रा. फ्लॅट डी ७०३, श्रीजी विहार सोसायटी,
पिंपळे सौदागर, पुणे.

मार्फत;
ॲड. प्रितीश हणमंतराव टेंकाळे
ऑफिस: व्यंकटेश्वरा नगर, रींग रोड, नांदेड.
मो. 9028332134

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार राम गणपतराव मंगनाळे रा. भावसार चौक, शास्त्री नगर, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटण देण्यात येते की, आमच्या पक्षकाराने रविशंकर पि. हरी नेरनाळे रा. सिडको, ता.जि.नांदेड व अनिल पि. वसंतराव पाटील रा. नरहर नगर, नांदेड ता. जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील ग्रामपंचायत कोंढा मौजे कोंढा ता.अर्धापुर प. स. व जि.प. नांदेड पैकी मौजे. कोंढा येथील शेत गट नंबर 373 आहे. शेत नामे [वाघमारी] आहे. क्षेत्रफळ 4 हेकटर 82 आर आकार 17 रु 14 पैसे, पैकी त्यांच्या हिस्स्याचे 1 हेक्टर 01 आर जिरायतीचे शेत आमचे पक्षकारास कायमचे विक्री करण्याचा सौदा केला आहे. ज्याची चतुः सिमा, पूर्वेस :- सरकारी पांदण आहे पश्चिमेस :- सीताराम नागोजी व सखाराम नागोजी यांची जमीन आहे दक्षिणेस :- बालाजी कदम व राजू कदम यांची जमीन आहे उत्तरेस :- अनिल पाटील व सदाशीव पुंड यांची जमीन आहे येणे प्रमाणे चतुर्सिमेच्या आतील मिळकत विकत घेण्याचा/हस्तांतर करण्याचा सौदा/करार केला आहे व करारापोटी ईसारा रक्कम पण दिली आहे. तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटणाद्वारे सुचित करण्यात येते की, कोणास सदरील मिळकतीबाबत किंवा सदरील व्यवहाराबाबत काहीही आक्षेप असल्यास त्यांनी आपला लेखी आक्षेप संबंधीत कागदपत्रासह हे जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या तारखेपासून 7 दिवसाच्या आत खालील पत्यावर नोंदवावा. मुदतीत कोणाचे काही आक्षेप न आल्यास आमचे पक्षकार सदरील मिळकतीचा चा व्यवहार पुर्ण करून रितसर खरेदी खत / हस्तांतरण करून घेतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत. करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार;
राम गणपतराव मंगनाळे
रा. भावसार चौक, शास्त्री नगर, नांदेड.

मार्फत;
ॲड. प्रितीश हणमंतराव टेंकाळे
ऑफिस: व्यंकटेश्वरा नगर, रींग रोड, नांदेड.
मो. 9028332134

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## नरबळीची मागणी करत मारहाण; अघोरी प्रथा कायद्यान्वये चार जणांविरोधात गुन्हा दाखल

### 'घरातील गुप्तधन हवे तर मुलीचा बळी द्या' - जादूटोणा विरोधी कायद्याची पहिली कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** घरातील गुप्तधन काढण्यासाठी मुलीचा नरबळी द्यावा लागेल, अशी अघोरी मागणी करत एका महिलेला शिवीगाळ, मारहाण आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार वाजेगाव येथे घडला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात ४ जणांविरोधात महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम २०१३ सह बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. २८ जुलै रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास जामा मस्जिदजवळ, वाजेगाव, नांदेड येथे घडली. फिर्यादी शबाना खदीर शेख (वय २८, रा. कहाळा ता. नायगाव) या माहेरी वाजेगाव येथे आल्या होत्या. त्यावेळी आरोपींनी त्यांच्याकडे घरातील गुप्तधन काढण्यासाठी नरबळी द्यावा लागेल आणि 'तुझ्या मुलीचा नरबळी देऊ' अशी मागणी केली.

यावर फिर्यादीने 'मी माझ्या मुलीचा बळी देणार नाही आणि मला गुप्तधन नको आहे' असे सांगितले. याचा राग येऊन आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. यावेळी पोलिसांनी शेख सलीम शेख महेबूब, इरफाना सलीम शेख दोघे रा. वाजेगाव, शरीफ आणि इतर एक दोघे रा. गोकुळनगर, नांदेड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. ९१८/२०२६ कलम ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) बीएनएस-२०२३ सह कलम ३(२), ३(३) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम २०१३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक रेखा काळे हे करीत आहेत.

राज्यात अघोरी प्रथा आणि अंधश्रद्धा पसरवणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे शासनाचे धोरण आहे. या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यात जादूटोणा प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे. अंधश्रद्धा, जादूटोणा, नरबळी यासारख्या अमानुष प्रथांची माहिती मिळाल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

## एसआयआरच नाही, तर संपूर्ण विकासात लोहा, कंधार मतदारसंघ जिल्ह्यात अव्वल -आ. चिखलीकर

### लोहा येथील 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला' नागरिकांचा प्रतिसाद



**लोहा (प्रतिनिधी)–** निवडणूक विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या एसआयआर उपक्रमात नांदेड जिल्ह्यात लोहा-कंधार मतदार संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केवळ एसआयआरच नाही, तर सर्वच विकासकामांत आणि प्रशासकीय उपक्रमांत आपला मतदारसंघ जिल्ह्यात नेहमीच अग्रस्थानी राहील, असा विश्वास लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

लोहा येथील के. के. मंगल कार्यालयात महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानात' अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी (कंधार) विलास नरवटे, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, लोहा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम भाई शेख, गटनेते भास्करराव पाटील पवार, महावितरणचे कार्यकारी अभियंता चव्हाण, उपकार्यकारी अभियंता सुतार, शहर अभियंता स्वामी, तालुका कृषी अधिकारी कासराळे, सदानंद पोटपेलवार, संतोष सोनवळे, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता बनसोडे, कराड, पोलीस निरीक्षक जाधव, मुख्याधिकारी भोळे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पाटील, सामाजिक वनीकरण विभागाचे लक्ष्मण शेळके, कंधार तलाठी संघाचे तालुका उपाध्यक्ष परशुराम जाधव, लोहा तलाठी संघाचे नारायण गाडे, निळकंठ पांडागळे, निखिल सुंदगिरवार, मंडळ अधिकारी अजय ठाकूर, के. जी. रेणके, मोतीराम पवार, नालमवार, दगडूबा देवळे, अजय काकणे आणि पुरवठा विभागाचे गणेश मोहिजे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**उत्कृष्ट कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा सत्कार**

कार्यक्रमादरम्यान आमदार चिखलीकर यांनी सर्व प्रशासकीय विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. लोहा मतदारसंघात एसआयआरचे उत्कृष्ट काम करणाऱ्या बीएलओंचा आणि इयत्ता ५ वी व ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार चिखलीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर संजय गांधी निराधार योजना, कृषी विभाग, घरकुल योजना, 'लेक लाडकी' यांसह विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी संबोधित करताना आ. चिखलीकर म्हणाले, मुसळधार पाऊस असतानाही सर्व विभागांचे शासकीय अधिकारी-कर्मचारी येथे उपस्थित राहून जनतेची कामे करत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे. शेतकरी व कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी हे शिबीर आयोजित केले आहे. बळीराजासाठी शेत-पांदण रस्ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. पांदण रस्ता अडवणाऱ्यांवर कठोर पोलीस कारवाई करण्याचा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. तसेच २०११ पूर्वीची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे.

## रेणापूर-सुधा प्रकल्पासाठी १०.८५ कोटी मंजूर

### आ. श्रीजया चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर तालुक्यातील रेणापूर प्रकल्पाची उंची वाढवणे आणि भूसंपादनाच्या कामासाठी राज्य सरकारने १० कोटी ८५ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे यश आहे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या सदर कामासाठी हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. भोकर विधानसभा मतदारसंघातील जलसिंचन व जलसंधारण विभागाच्या प्रलंबित कामांसाठी शासनाकडून आवश्यक निधी मिळावा आणि मतदारसंघातील विकास-कामे मार्गी लागावीत, यासाठी आमदार श्रीजया चव्हाण सातत्याने पाठपुरावा करत आहेत. रेणापूर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी आणि उंची वाढवण्याच्या कामासाठी मिळालेला हा १० कोटी रुपयांचा निधी हा त्यांच्या अथक प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे.

सदरहू महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी निधी मंजूर केल्याबद्दल आमदार श्रीजया चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे, तर सहकार्य केल्याबद्दल माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## शिवसेना उपनेते बबनराव थोरात यांचा नांदेड-हिंगोली जिल्हा दौरा; पदाधिकारी बैठका आणि कीर्तन सोहळ्यास उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना उपनेते तथा संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांचा नांदेड आणि हिंगोली जिल्ह्याचा दौरा शनिवार, दि. १ ऑगस्ट व रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी होणार आहे. या दौऱ्यात ते जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसोबत संघटनात्मक आढावा बैठक घेणार आहेत.

नांदेड जिल्ह्यात शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी आगमन झाल्यानंतर दुपारी १२:३० वाजता जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन सूचना देणार आहेत. ही बैठक शासकीय विश्रामगृह येथे होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात सहभागी होणार आहेत. कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांचा कीर्तन सोहळा शहरापासून जवळच असलेल्या पासदगाव राधेश्वरी मंगल कार्यालयात पार पडणार आहे. या सोहळ्यालाही संपर्कप्रमुख बबनराव थोरात आपल्या कार्यकर्त्यांसोबत उपस्थित राहणार आहेत.

रविवार, दि. २ ऑगस्ट दुपारी १२:३० वाजता हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकारी यांची बैठक शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे घेणार आहेत. नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यातील दोन्हीही बैठकांना सहसंपर्कप्रमुख, जिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, जिल्हा समन्वयक, उपजिल्हाप्रमुख, विधानसभा प्रमुख, विधानसभा संघटक, उपजिल्हा संघटक, तालुकाप्रमुख, तालुका संघटक, समन्वयक, उपतालुकाप्रमुख, माजी- विद्यमान जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, शहरप्रमुख, शहर संघटक, शहर/तालुका समन्वयक, सहसंघटक, सहसमन्वयक, सर्कल प्रमुख, गण प्रमुख तसेच अल्पसंख्याक आघाडी, दलित आघाडी, महिला आघाडी, युवासेना आणि शिवसेनेच्या सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहवे, असे आवाहन नांदेडचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, ज्योतिबा खराटे, बबन बारसे, हिंगोलीचे जिल्हाप्रमुख अजय सावंत (गोपू पाटील), संदेश देशमुख, सहसंपर्कप्रमुख विनायक भिसे, सुनील काळे, जिल्हा संघटक बाळासाहेब मगर आणि नांदेड-हिंगोली जिल्ह्याचे युवासेना विभागीय सचिव महेश खेडकर यांनी केले आहे.

## उमरा परिसरात पुन्हा जनावरे चोरी

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील उस्माननगर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या उमरा परिसरात दि. २९ जुलै रोजी मध्यरात्री शेत आखाड्यांवरून ५ जनावरे चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. चार दिवसांपूर्वीच गोळेगाव (तपोवन) येथून दोन म्हशी चोरीला गेल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा उमरा परिसरात जनावरांची चोरी झाल्याने चोरट्यांची टोळी सक्रिय झाल्याची चर्चा सुरू झाली असून, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार उमरा येथील शेतकरी पवन पंडितराव सिरसाट यांच्या उमरा खांडी शेत आखाड्यातून सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीची एक बैलजोडी व गजानन सज्जनराव सिरसाट यांच्या शेतातून ५० हजार रुपये किंमतीची एक गाय तसेच विनायक भानुदासराव सिरसाट यांच्या शेतातून एक बैल ६० हजार रुपये व एक गाय ५० हजार रुपये किमतीची जनावरे चोरट्यांनी पळविल्याची घटना बुधवारी रात्री घडली आहे. या तिन्ही घटनांमध्ये एकूण पाच जनावरे चोरीला गेली असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.चालू शेतातील मशागतीची कामे, पेरणीसाठी झालेला खर्च त्यातच ही नुकसान शेतकऱ्यांसाठी अवघड झाले आहे. या बाबतीत संबंधित शेतकऱ्यांनी उस्माननगर पोलिसांत तक्रार दाखल केली असून तपास सुरू आहे.

## बेलवाडी खून प्रकरणात आरोपीला जन्मठेप

**नांदेड (प्रतिनिधी)–**जन्मदात्या आईचा कोयत्याने मारून निर्घृण खून करणाऱ्या आरोपी मुलाला कंधार येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश (दुसरे) ए. पी. कुलकर्णी यांनी गुरुवार, दि. ३० जुलै रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. माळाकोळी पोलीस ठाण्यात गु.र.नं. १६१/२०२३, कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये दाखल असलेल्या सत्र प्रकरण क्र. ०६/२०२४ मध्ये महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपीला दोषी ठरवले होते.

दि. २४ आक्टोबर २०२३ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास माळाकोळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलवाडी शिवार येथे कौटुंबिक कारणातून माझं लग्न होत नाही, तुम्ही खर्चण्यासाठी पैसे देत नाही, तसेच जमीन नावावर करून देत नाही या किरकोळ कारणांवरून इंजीनियरिंग झालेला आरोपी नृसिंह बालाजी केंद्रे याने आपल्या आईवर लोखंडी कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले. हा प्रकार त्याच्या वडिलांनी बघितल्याने जखमी महिलेला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

या प्रकरणी फिर्यादी बालाजी एकनाथराव केंद्रे यांच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन माळाकोळी येथे गु.र.नं. १६१/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मयत महिलेच्या पतीचा जबाब, घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय पुरावे, शस्त्र जप्ती, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब तसेच इतर वैज्ञानिक व परिस्थितीजन्य पुरावे संकलित करण्यात आले.

तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांनी आरोपीविरुद्ध भक्कम दोषारोपपत्र विहित वेळेत न्यायालयात दाखल केले. न्यायालयाने तपासादरम्यान संकलित करण्यात आलेले वैद्यकीय, तांत्रिक व परिस्थितीजन्य पुरावे ग्राह्य धरून आणि आठ साक्षीदार तपासून आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सहायक सरकारी अभियोक्ता नितीन कागणे यांनी साक्षीदारांचे प्रभावी परीक्षण करून आरोपीविरुद्धचे पुरावे भक्कमपणे न्यायालयासमोर मांडले.

## देवबा आगबोटे यांचे निधन



**कंधार (प्रतिनिधी)** – कंधार तालुक्यातील राऊतखेडा येथील देवबा मरीबा आगबोटे यांचे अल्पशा आजाराने ३० जुलै २०२६ रोजी स. ११ वाजता निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ३१ जुलै रोजी स. १० वा. त्यांचे मूळ गाव राऊतखेडा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पत्रकार प्रल्हाद दे. आगबोटे व विलास आगबोटे यांचे ते वडील होत.

## निरंतर वीज योजनेंतर्गत नांदेड, परभणी, हिंगोलीला ८९० नवीन रोहित्र प्राप्त

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** नांदेड परिमंडळातील नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील वीज यंत्रणा मजबुतीकरणासाठी महावितरणकडून वेगवान प्रयत्न सुरू आहेत.



मराठवाड्याचे भूमिपुत्र धनंजय औंढेकर हे महावितरणचे संचालक (संचलन) झाल्यापासून नांदेड परिमंडलातील वीजविषयक विकास कामांसाठी लागणाऱ्या साहित्याला प्राधान्य देण्यात येत आहे. निरंतर वीज योजनेअंतर्गत परिमंडलास महावितरण मुख्यालयाकडून विविध क्षमतेची एकूण ८९० नवीन विद्युत वितरण रोहित्र प्राप्त झाली आहेत. प्राप्त झालेली सर्व रोहित्रे केवळ गावठाण आणि नागरी भागातच बसविण्यात येत आहेत.

नांदेड जिल्हा- ३१५ केव्हीएचे २, २०० केव्हीएचे ३४, १०० केव्हीएचे १९० रोहित्र, परभणी जिल्हा- २०० केव्हीएचे १९, १०० केव्हीएचे ४६७, २५ केव्हीएचे १७८ रोहित्र आणि हिंगोली जिल्हा-१०० केव्हीएची १५० रोहित्र देण्यात आले आहेत. प्राप्त रोहित्रांपैकी ८० ते ८५ टक्के रोहित्रे गरजेनुसार आवश्यक त्या ठिकाणी बसविण्यात आली आहेत. नांदेड शहरात या नवीन रोहित्रांची आस्थापना प्राधान्याने करण्यात आल्याने शहरात सध्या अधिक अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा होत आहे. नवीन विद्युत वितरण रोहित्रांच्या आस्थापनेमुळे रोहित्रे अतिभारित होऊन वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण नियंत्रणात आले आहे. त्यामुळे ग्राहकांना अधिक चांगल्या आणि अखंडित वीजपुरवठ्याची सोय झाली आहे.

**पान १ वरून...**

**महाराष्ट्रभरात पावसाचं...**

सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पंचगंगा नदीची पाणीपातळी ३३ फूट ५ इंच इतकी झाली असून, जिल्ह्यातील ३८ बंधारे पाण्याखाली गेल्याची माहिती आहे. पंचगंगा नदीने इशारा पातळी घालण्यात नागरिकांनी स्थलांतरित होण्याच्या प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून उघडीप दिलेल्या पावसाने काल मध्यरात्रीपासून बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात जोरदार हजेरी लावल्याने जिल्हाभरात शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सिडको येथे ध्वजारोहण



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव सिडको यांच्या वतीने १ ऑगस्ट रोजी १०६ व्या जयंतीनिमित्त सकाळी ९ वाजता अण्णा भाऊ साठे स्मारक येथे शिवसेना दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार असून, २९ व ३० ऑगस्ट रोजी दोन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिडको येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता अण्णाभाऊ साठे स्मारक येथे शिवसेना दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे तर २९ व ३० ऑगस्ट रोजी विद्यार्थी गुणगौरव व सन्मान, उद्योजकांचा सन्मान, सामाजिक, राजकीय मान्यवरांचा सन्मान, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर व्याख्यान आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. १ ऑगस्ट जयंतीनिमित्त समाज बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती मंडळ अध्यक्ष अंकुश गायकवाड, सचिव पप्पू गायकवाड, कार्याध्यक्ष रंगनाथ गजले, कोषाध्यक्ष नितीन वाघमारे, स्वागताध्यक्ष रमेश तालीमकर यांच्यांसह पदाधिकारी यांनी केले आहे.

## अनुसूचित जमाती कल्याण समिती दौऱ्याच्या पूर्वतयारीचा आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीचा नांदेड जिल्हा दौरा येत्या १० ते १२ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदिप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे बैठक संपन्न झाली.

बैठकीस किनवटचे सहायक जिल्हाधिकारी तथा आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी बी. सरवनन, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, पोलीस, मनपा, सार्वजनिक बांधकाम, कृषी, क्रीडा, महावितरण, जलसंपदा, वन विभाग, पुशसंवर्धन, राज्य उत्पादन शुल्क आदी संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## शहरातील रस्ते विकासाबाबत मनपात आढावा बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महानगर-पालिकेत गुरुवार, दि. ३० जुलै रोजी महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहरात पूर्ण झालेल्या आणि सद्यस्थितीत सुरू असलेल्या रस्त्यांच्या विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या महत्त्वपूर्ण बैठकीस मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, माजी महापौर जयश्री पावडे, माजी सभापती किशोर स्वामी, नगरसेवक प्रशांत तिडके, सतीश देशमुख, संजय घोगरे, अभिषेक सौदे, तुलजेश यादव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, उपअभियंता एस. बी. नरमीटवार, सहायक अभियंता एस. बी. नाईक, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, उपअभियंता खुशाल कदम आणि मनपाचे इतर तांत्रिक अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहराच्या मुख्य भागांत पूर्ण झालेल्या रस्त्यांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या कामांच्या प्रगतीचा अहवाल अधिकाऱ्यांनी सादर केला. रस्त्यांची कामे करताना गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करता येणार नाही, असे महापौरांनी स्पष्ट केले. कामांचा दर्जा उत्तम राखण्यासाठी नियमित तपासणी व देखरेख करण्याचे आदेश देण्यात आले. त्याचप्रमाणे सुरू असलेली कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून नागरिकांना होणारा त्रास तत्काळ कमी करावा, अशी सूचना मनपा आयुक्तांनी केली. रस्ते खोदाई, पाईपलाईन, आणि वीजवाहिन्यांच्या कामांमुळे नुतनीकरण केलेल्या रस्त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी आपापसात योग्य समन्वय राखूनच कामे करावीत, असे निर्देश देण्यात आले.

या बैठकीत उपस्थित नगरसेवकांनी आपापल्या प्रभागा संदर्भातील तक्रारी मांडल्या. शहरात बहुतांश ठिकाणी गतीरोधकामुळे अपघात होत असल्याने अनावश्यक ठिकाणचे गतिरोधक काढून आवश्यक त्या ठिकाणी जसे शाळा, दवाखाने, कोचिंग क्लासेस, चौक इत्यादी ठिकाणी गतिरोधक ठेवण्याच्या सुचना देण्यात आल्या. बऱ्याच रस्त्यांची उंची अनावश्यक वाढल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत असल्याचे यावेळी नगरसेवकांनी सांगितले.

शहरातील यशवंत कॉलेज ते श्यामनगर दवाखाना हा रस्ता खूप दिवसांपासून प्रलंबित असल्याने सदरील काम तत्काळ पूर्ण करावे. जुना कौठा, सिडको भागातील झालेल्या रस्त्यांमुळे नागरिकांना सांडपाण्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने त्वरित उपाययोजना कराव्यात. जुन्या नांदेड भागातील रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या जागेनुसार रस्त्याची रुंदी असावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

बैठकीच्या शेवटी आपत्ती व्यववस्थापनाच्या दृष्टीकोणातून विविध ठिकाणची कामे मार्गी लावणे आवश्यक असल्याचे मनपा आयुक्तांनी सांगितले. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत झालेल्या रस्त्यावर पथदिवे व रस्त्यांची डागडुज्जी करण्याची जबाबदारी बांधकाम विभागाची असल्याचे मनपा आयुक्तांनी स्पष्ट केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com